नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ४५ * अंक ३१६ * * चंद्रपूर * मंगळवार, दिनांक १३ मे २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## युद्धविरामानंतर ३२ विमानतळे उघडली

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :

सोमवारी, भारत आणि पाकिस्तानमधील युद्धविरामाच्या ४३ तासांनंतर, ९ राज्यांमधील ३२ विमानतळे तत्काळ प्रभावाने उघडण्यात आली. विमान कंपन्यांनी प्रवाशांसाठी बुकिंग सुरू केले आहे. ९ मेपासून १५ मे रोजी सकाळी ५:२९ वाजेपर्यंत ३२ विमानतळांवरील विमान सेवा बंद ठेवण्यात आल्या होत्या.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ७ मे रोजी पाकिस्तानवर हवाई हल्ला केला. पाकिस्ताननेही प्रत्युत्तर दिले. दोन्ही देशांमधील संघर्ष १० मे पर्यंत सुरू होता. १० मे रोजी सायंकाळी भारत आणि पाकिस्तानने युद्धविरामाची घोषणा केली.

अग्राग्रलेख

### खरीखरी..

## सुट्ट्या जास्त, काम कमी

आपल्या देशातील काही गोष्टींवरती गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. कारण सध्या आपल्या देशात सरकारी कार्यालये, बँका, शाळा-महाविद्यालयं आणि काही स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आस्थापना यांना कामाचे दिवस किती आणि सुट्टीचे दिवस किती यांचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. गेल्या दोन महिन्यात शनिवार रविवार आणि पुढेमागे सुट्टी असल्यामुळे सतत तीन दिवस काम बंद राहिले. महिन्याच्या सुरुवातीला एक सुट्टी गुरुवारची होती म्हणजे फक्त शुक्रवारची रजा टाकून चार दिवस मजा असा बहुसंख्य सुट्टीवीरांचा कार्यक्रम ठरलेला असतोच. सर्व धमार्चे सण तसेच अनेक महापुरुष आणि त्यांच्या जयंती किंवा पुण्यतिथी याबाबतीत सर्वधर्म सुट्टीसमभाव असल्याने त्यांच्या एकूण सुट्ट्यांची गोळाबेरीज केली. तर 365 दिवसांपैकी जवळजवळ 150 दिवसांपेक्षा जास्त सुट्ट्या होतात. त्यानंतर सरकारी कर्मचाऱ्यांच्या व शिक्षकांच्या पगारी रजा किंवा बिनपगारी आणि आजारपणाच्या रजा या सर्व सुट्ट्या घेणे. हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे. असेच त्यांना वाटते. आजकाल काही नाणावलेल्या वर्तमानपत्रांमध्ये जाहिरातींचा इतका भडीमार असतो की त्यात 80 टक्के जाहिराती आणि 20 टक्के बातम्या आणि इतर दुसरे काही असा सर्व प्रकार असतो. त्याचप्रमाणे आपल्याकडे विद्यार्थ्यांना असलेल्या सुट्ट्यांची गणती केली. तर आम्ही वर म्हटल्याप्रमाणे 150 दिवसांपेक्षाही जास्त सुट्ट्या असतात. आता सरकारने शासकीय सुट्ट्या म्हणून शनिवार आणि रविवार हे दिवस मुकर्रर केलेले आहेत. शनिवारी बऱ्याच ठिकाणी शाळा अर्धवेळ भरतात. सध्या सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच बँकेच्या कर्मचाऱ्यांनाही सर्व शनिवारच्या सुट्ट्या हव्या आहेत. संपूर्ण मे महिना शाळांना सुट्टी असते. पूर्वी या काळात मामाच्या गावाला जायचे ठरलेले होते. आता अनेक मामा गावातून शहरात आलेले आहेत. मामांच्या बहिणींनाही नोकरी असल्याने त्यांना सुट्टी मिळू शकत नाही. अशी सध्याची सामाजिक परिस्थिती आहे. मात्र यापुढे यामध्ये बदल करण्याची गरज आहे असे कोणालाही वाटत नाही. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी गेल्या अकरा वर्षात एकही सुट्टी घेतलेली नाही आणि ते तर प्रत्येक दिवशी 18 ते 20 तास काम करतात. असे नेहमीच सांगण्यात येते. त्यांनी तरी भारतात या अमर्याद सुट्ट्यांच्या संख्येवर बंधने आणली पाहिजेत. शाळा महाविद्यालयातील दहा दिवसाची नाताळ सुट्टी असते. हा नाताळ पाळणारे शाळा आणि महाविद्यालयात किती असतात. याचाही विचार केला पाहिजे. इंग्रजांचे राज्य असताना त्यांना भारतातील तापमान सहन होत नव्हते. म्हणून तेव्हापासून मे च्या सुट्ट्या, तेव्हाचे राज्यकर्ते ख्रिस्ती होते. म्हणून नाताळच्या सुट्ट्या. अशाप्रकारे असलेल्या सुट्ट्यांचा फेरविचार का केला जात नाही. सध्या अनेक महापुरुषांच्या नावाने सुट्ट्या दिल्या जातात. त्यादिवशी महापुरुषांच्या आदर्शा प्रमाणे कोण कोण वागते. याचा अभ्यास केला तर अतिशय भयानक आणि विदारक सत्य बाहेर येईल. एकूणच केंद्र सरकारने याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. भारताच्या जवळजवळ 150 कोटी लोकसंख्येपैकी दोन ते चार लाख पारसी असतील. तरीही त्यांची सुट्टी असते. आपल्याकडे एकादशी, घटस्थापना, जन्माष्टमी, रामनवमी, महाशिवरात्री वगैरे असतात. विसर्जित होणारा गणपती उत्सव हे आणि असे अनेक सुट्ट्यांचे दिवस आहेत?. आज कालच्या गणेशोत्सवाच्या दहा दिवसात काय काय कार्यक्रम होतात. याचे दर्शन स्वगार्तून घेत असलेल्या लोकमान्य टिळकांना आपण का हा उत्सव सुरू केला. असेच वाटत असेल. गणपतींचे दहा दिवस म्हणजे आतषबाजी पासून इतर अनेक बाजीगरांच्या बाज्यांच्या दिवसांचे पर्व असते. हे कटू आहे पण सत्य आहे. आता या सुट्ट्या आम्ही वर उल्लेख केलेल्या घटकांनाच मिळतात. शेतीत राबणारा शेतकरी, फुकटचे अन्न मिळेपर्यंत घेणारे आणि लाडक्या योजना मिळेपर्यंत असणारे आणि त्यासोबत अगदी आपले पंतप्रधान मोदी असा बराच मोठा वर्ग या सुट्टीच्या दिवशी काम करीत असतो. खाजगी कारखाने, खाजगी कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे सुट्ट्यांचे लाड अजिबात केले जात नाहीत. असंघटित कामगारांची संख्या सुद्धा मोठी आहे. त्यांनाही हाताच्या बोटावर मोजण्या इतक्याच सुट्ट्या असतात. म्हणजेच वर उल्लेख केलेले काही मूठभर घटक सोडले. तर इतर कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्यांचे लाड चालत नाहीत. भारतासारख्या विकसनशील देशात, वरील महत्वाच्या घटकांनी वषार्तील चार ते साडेचार महिन्याची सुट्टी उपभोगणे योग्य आहे काय. याचाही विचार केला गेला पाहिजे. आपले राज्य कल्याणकारी आहे. त्याच्यासाठी सेवा करणारे पोलीस असो किंवा इतर कर्मचारी असोत. त्यांनी किती सुट्ट्या घ्याव्यात. याचा जर साकल्याने नीट विचार केला. तर आठ महिने काम करून चार महिन्याचा फुकट पगार बरीच मंडळी घेतात. सुट्ट्या जास्त आणि काम कमी असेच हे सूत्र आहे. एकूणच सुट्ट्यांचे हे पुराण अत्यंत भयानक आहे. आधीच जनतेला आळशी करणाऱ्या योजना आणि त्यात या विनाकारण असलेल्या सुट्ट्यांची भर अस्वस्थ करून जाते. मग, अशा प्रकारच्या सुट्ट्यांना सुट्टी देण्याबाबत एखादा कायदा करता येईल काय. हाच आमचा विनम्र सवाल आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## पाकिस्तानविरोधातील कारवाई
# केवळ स्थगित

### तिन्ही सेना अलर्ट मोडवर : प्रधानमंत्री मोदींचा इशारा

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १२ :

पाकिस्तानसोबत युद्धबंदी झाल्यानंतर ५१ तासांनी, पंतप्रधान मोदींनी सोमवारी रात्री ८ वाजता देशाला संबोधित केले. ऑपरेशन सिंदूरबद्दल पंतप्रधान म्हणाले की, ज्या दहशतवाद्यांनी आपल्या माता-भगिनींचे सिंदूर पुसले होते, त्यांचा आम्ही नाश केला आहे. आमच्या कारवाईत १०० हून अधिक भयानक दहशतवादी मारले गेले आहेत.

ते म्हणाले की, पाकिस्तानच्या विनंतीवरून भारताने संघर्ष थांबवण्यास सहमती दर्शविली आहे. ते म्हणाले की, भारताने पाकिस्तानविरुद्ध फक्त लष्करी कारवाई पुढे ढकलली आहे. पाकिस्तानचा दृष्टिकोन पाहून आम्ही पुढील कारवाईचा निर्णय घेऊ. पाकिस्तानकडून येणारा अणुहल्ल्याचा धोका खपवून घेतला जाणार नाही. भारताच्या तिन्ही सैन्याने सर्व परिस्थितींना तोंड देण्यासाठी सज्ज आहेत.

भगवान बुद्धांनी आपल्याला शांतीचा मार्ग दाखवला आहे. शांतीचा मार्ग देखील सत्तेतून जातो. मानवतेला शांती आणि समृद्धीकडे वाटचाल करण्यासाठी, प्रत्येक भारतीयाला शांततेत जगता यावे, विकसित भारताचे स्वप्न पूर्ण व्हावे यासाठी, भारत शक्तिशाली असणे आवश्यक आहे. गरज पडल्यास या शक्तीचा वापर करणे महत्त्वाचे आहे. गेल्या काही दिवसांत भारताने हेच केले आहे.



पाकिस्तानला टिकून राहायचे असेल तर त्याला त्याचे दहशतवादी पायाभूत सुविधा नष्ट कराव्या लागतील, दहशतवाद आणि चर्चा, दहशतवाद आणि व्यापार एकत्र चालू शकत नाहीत. पाणी आणि रक्त देखील एकत्र वाहू शकत नाहीत. पाकिस्तानशी चर्चा फक्त दहशतवाद आणि पीओकेवरच असेल, असेही मोदी म्हणाले.

दहशतवादा विरुद्धच्या लढाईत ऑपरेशन सिंदूरने एक नवीन रेषा आखली आहे. जर दहशतवादी हल्ला झाला तर त्याला योग्य उत्तर दिले जाईल. आम्ही आमच्या पद्धतीने आणि आमच्या स्वतःच्या अटींवर प्रतिसाद देऊ. जिथे जिथे दहशतवाद्यांची मुळे उफाळून येतील तिथे आम्ही कडक कारवाई करू, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

भारत कोणतेही आण्विक ब्लॅकमेल सहन करणार नाही. भारत त्यांच्या आश्रयाखाली वाढणाऱ्या दहशतवादी अड्ड्यांवर अचूक आणि निर्णायक हल्ला करेल. जेव्हा पाकिस्तानी सैन्याचे उच्च अधिकारी मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांना निरोप देण्यासाठी जमले तेव्हा जगाने पाकिस्तानचे कुरूप सत्य पाहिले. हा राज्य पुरस्कृत दहशतवादाचा मोठा पुरावा आहे, असेही त्यांनी सांगितले.

## याच वर्षी सुरू करणार
# पैनगंगा – नळगंगा प्रकल्प

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १२ :

विदर्भातील शेतकऱ्यांना लाभदायी ठरणारा पैनगंगा-नळगंगा प्रकल्प याचवर्षी सुरू केला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केली. एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयाचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या कार्यक्रमात दोन घोषणा केल्या.

मुख्यमंत्री म्हणाले, वैनगंगा ते नळगंगा हा सिंचन प्रकल्प याच वर्षी सुरू करणार. या प्रकल्पामुळे १० लाख एकर जमीन ओलीताखाली येणार आहे. १ लाख कोटी रुपये या प्रकल्पवार गुंतवीत आहोत. त्यामुळे वर्धा व विदर्भातील शेतकऱ्यांना याचा मोठा लाभ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

रामनगर परिसरात हजारो कुटुंबे लिज जमिनीवर अनेक वर्षांपासून राहत आहे. ठराविक वर्षानंतर ती लिज वाढवून घ्यावी लागते. याचा नागरिकांना मनस्ताप होत असल्याची बाब आमदार झाल्यापासून डॉ. पंकज भोयर मांडत आहेत.



मुख्यमंत्र्यांची घोषणा

त्याची दखल घेत मुख्यमंत्री म्हणाले की, मिळावा, म्हणून तसा प्रस्ताव सादर करावा. हे लिज पट्टे कायमचे मालकी हक्काचे करून देण्याचे काम त्वरित करून दिल्या जाईल. फडणवीस यांनी यावेळी तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प, लखपती दिदी, शक्तिपीठ मार्ग, सेवा पंधरवडा, आदिवासी योजना यांचा उल्लेख केला. लोकार्पण करण्यात आलेल्या एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयाबाबत डॉ. भोयर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. यामुळे ते पूर्वीच मान्य केले होते. वास्तू व अन्य सुविधा व्हायच्या होत्या. त्या झाल्यात.

याप्रसंगी बोलताना पालकमंत्री डॉ. भोयर यांनी जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा घेत मुख्यमंत्र्यांना धन्यवाद दिले आणि बोर व्याघ्र प्रकल्प हा विकास व पर्यटनपूरक करून देण्याची विनंती केली. आदिवासी विकासमंत्री अशोक उईके, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आमदार सुमित वानखेडे, दादाराव केचे, समीर कुणावार, राजेश बकाने यांचेसह भाजपाचे पदाधिकारी तसेच शासकीय अधिकारी उपस्थित होते.

## अमेरिकेची मदत घेण्याची गरज काय?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

शरद पवार यांनी भारत-पाकिस्तान यांच्यात डोनाल्ड ट्रम्प यांची मध्यस्थी योग्य नसल्याचे म्हटले आहे. यावेळी त्यांनी शिमला कराराची देखील आठवण करून दिली.

या करारानुसार दोन्ही देशांमधील वादात तिसरा कोणीही मध्यस्थी करू शकत नाही. भारत-पाकिस्तान संघर्षात अमेरिकेची मदत घेण्याची आवश्यकता काय? असा सवाल शरद पवार यांनी केंद्र सरकारला केला आहे.

भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी झाल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. अमेरिकेच्या मध्यस्थीने हा मार्ग काढण्यात आल्याचे सांगत त्यांनी दोन्ही देशांचे आभारही मानले.

पवार म्हणाले, मला शिमला करार आठवतोय. शिमला करार इंदिरा गांधी आणि झुलफिकार अली भुट्टो यांच्यात झाला होता. त्यात आमच्या देशाचे मुद्दे आम्ही सोडवू, त्यात इतरांनी हस्तक्षेप करायचा नाही असे ठरले होते. असे असताना अमेरिकेची मदत घेण्याची काय आवश्यकता आहे? असा प्रश्न कोणी विचारला तर केंद्राला यावर उत्तर द्यावे लागेल.

## एसटीत मेगाभरती!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) ला आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने पुढील काही वर्षांत २५,००० स्वमालकीच्या नव्या बसेस ताफ्यात सामील होणार आहेत. या बसेस चालवण्यासाठी आणि महामंडळाच्या विविध विभागांना बळकटी देण्यासाठी चालक, वाहक, अभियंते आणि इतर कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर नोकरभरती करण्यात येणार आहे.

याबाबतच्या ठरावाला एसटी महामंडळाच्या 307व्या संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली असून, हा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

## दहावी बोर्डाचा निकाल आज

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने इयत्ता दहावीचा निकाल १३ मे रोजी दुपारी जाहीर करण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार, विद्यार्थ्यांना उद्या दुपारी १ वा. बोर्डाने निश्चित केलेल्या अधिकृत संकेतस्थळावर हा निकाल पाहता येईल.

मंडळाने सोमवारी पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या ९ विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (१० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपद्धतीनुसार मंगळवारी दुपारी १ वा. ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्याची घोषणा केली. विद्यार्थ्यांना बोर्डाच्या व इतर अधिकृत संकेतस्थळांवर हा निकाल पाहता येईल. दुसऱ्या दिवसापासून शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गुणपत्रिकांचे वाटप केले जाईल.

https://results.digilocker.gov.in
https://sscresult.mahahsscboard.in
http://sscresult.mkcl.org
https://results.targetpublications.org

या संकेतस्थळांवर निकाल पाहता येईल. विषयनिहाय संपादित केलेले गुण उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रतही (प्रिंट आऊट) घेता येईल. विशेषतः शाळांना या संकेतस्थळावर एकत्रित निकाल व इतर सांख्यिकीय माहिती उपलब्ध होईल.

## खाणीच्या खड्ड्यात सापडले पाच मृतदेह

### बुडून मृत्यू, आत्महत्या की घातपात? सुरगाव हादरले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

जिल्ह्यातील कुही पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सुरगावातील गर्ग खाणीच्या खड्ड्यात एकाच कुटुंबातील पाच जणांचे मृतदेह सोमवारी सायंकाळी बाहेर काढण्यात आले. त्यांच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त करण्यात येत असून मृतांमध्ये दोन मुले, दोन महिला आणि एका युवकाचा समावेश आहे. या प्रकरणी कुही पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. मृतकात रोशनी चंद्रकांत चौधरी (वय ३२, रा. धुळे), मुलगा मोहित चंद्रकांत चौधरी (वय १२), मुलगी लक्ष्मी चंद्रकांत चौधरी (वय १०), बहीण अंजली ऊर्फ रज्जो राऊत (वय २५ रा. नागपूर) आणि रज्जोचा मित्र इंतिराज अन्सारी (वय २०, रा. नागपूर) अशी मृतांची नावे आहेत.

रोशनी चौधरी ही मूळची नागपूरची असून बहिण रज्जो राऊतकडे आली होती. मुलगा मोहित, मुलगी लक्ष्मी आणि बहिण रज्जो व तिचा मित्र इंतिराज हे सर्व रविवारी पर्यटनासाठी कुही पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सूरगाव येथे गेले होते. दरम्यान, गर्ग खदानाच्या काठावर ते सर्व जण काही वेळपर्यंत बसले होते. पोलिसांच्या अंदाजानुसार, खाणीचा खड्डा होता. तेथील पाणी स्वच्छ असल्याने मुलांनी आंघोळ करण्याचा हट्ट केला असवा.

मात्र, खड्डा खोल असल्याचा अंदाज कुणालाच आला नाही. दोन्ही मुले अर्धनग्नावस्थेत असल्यामुळे ते आंघोळ करायला पाण्यात उतरल्याची शक्यता आहे. दरम्यान, मोहित आणि लक्ष्मी पाण्यात बुडत असताना आई रोशनी हिने पाण्यात उडी घेतली असावी. बहिणीला आणि मुलांना वाचविण्यासाठी रज्जोनेसुद्धा पाण्यात उडी घेतली. सर्वच जण पाण्यात बुडत असताना इंतिराज अन्सारी याने त्यांना विचविण्याचा प्रयत्न केला असावा. यादरम्यान, एकमेकांना वाचविण्याच्या प्रयत्नात सर्वच जण पाण्यात बुडाल्याचा अंदाज कुही पोलिसांनी वर्तवला आहे.

घटनेची माहिती मिळताच उमरेडच्या पोलीस उपविभागीय अधिकारी वृष्ठी जैन, कुहीचे ठाणेदार भानुदास पिदूरकर, कुही पाचगाव पोलीस चौकीचे प्रभारी हरिचंद्र इंगोले, हवालदार दिलीप लांजेवार, कुही पोलीस पथक घटनास्थळी पोहचले. स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने तातडीने मदतकार्य सुरू केले. नागपुरातील गोताखोर जगदीश खरे यांच्या मदतीने ४ तासांच्या शोध मोहीमेत पाच जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. मृतदेह पुढील तपासणीसाठी नागपूर येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.

पोलिसांनी याप्रकरणी अधिक तपास सुरू केला असून, खदान परिसरातील सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. स्थानिक प्रशासनाकडून सुरगाव-पाचगाव परिसरात शेकडो क्रेशर खदान परिसरात सुरक्षेसाठी तातडीने सूचना फलकासह अन्य उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. स्थानिकांनी खदान परिसरात अनधिकृत प्रवेश रोखण्यासाठी कठोर नियम लागू करण्याची मागणी केली.

## कोहलीने म्हटले कसोटी क्रिकेटला अलविदा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :

विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. कोहलीने सोमवारी इंस्टाग्रामवर लिहिले, कसोटी क्रिकेटने माझी परीक्षा घेतली आहे, मला आकार दिला आहे, असे धडे शिकवले आहेत जे मी आयुष्यभर लक्षात ठेवेन.



विराट कोहलीने १० मे रोजी बीसीसीआयला सांगितले होते की मी कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होऊ इच्छितो. बीसीसीआयने कोहलीला त्याच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यास सांगितले होते. ११ मे रोजी बोर्डाच्या एका अधिकाऱ्यानेही त्याच्याशी चर्चा केली.

डिसेंबर/जानेवारीमध्ये ऑस्ट्रेलियात झालेल्या बॉर्डर-गावस्कर मालिकेत विराटची कामगिरी चांगली नव्हती. या मालिकेत त्याने २३.७५ च्या सरासरीने धावा केल्या. ८ पैकी ७ वेळा तो ऑफ स्टंपच्या बाहेर चेंडूवर बाद झाला. कोहलीने बीजीटीमध्ये ९ डावात १९० धावा केल्या. यामध्ये एका शतकाचा समावेश होता. विराट कोहलीने १२३ कसोटी सामने खेळले आहेत.

## १८ वर्षीय तरुणीची भररस्त्यात निर्घृण हत्या

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :

पुण्यात एका १८ वर्षीय तरुणीची भररस्त्यात धारदार शस्त्राने वार करत निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. कोमल जाधव असे मृत तरुणीचे नाव आहे.

पिंपरी चिंचवड येथील वालेकरवाडी परिसरात रात्री दोन अज्ञात व्यक्तींनी रस्त्यातच सपासप वार करत तिचा खून केला. दोन्ही आरोपींना पोलिसांनी अवघ्या काही तासांतच अटक केली आहे.

कोमल जाधव पिंपरी चिंचवड येथील वालेकरवाडी परिसरात कृष्णाईनगर येथे अपलय कुटुंबासोबत राहत होती. रविवारी रात्री दुचाकीवरून आलेल्या अज्ञात दोन व्यक्तींनी तिच्यावर धारदार शस्त्राने वार करत कोमलची हत्या केली. माहितीनुसार हे दोघेही दिल्लीचे रहिवासी असून ते कोमलच्या ओळखीचे होते. पोलिसांनी दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

### १७ वर्षीय मुलाची हत्या

पिंपरी चिंचवड येथील दिघा परिसरात एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलाची हत्या करण्यात आली आहे. जुन्या भांडणाच्या कारणातून ही हत्या झाल्याचे समजते. या प्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. सोहम हा दिघी वरमुखवाडी या ठिकाणी केकीज या केकच्या दुकानासमोर मित्रांशी गप्पा मारत बसला होता, अचानक दुचाकीवर काही जण आले आणि शस्त्राने वार करीत खून केला.

## मुंबई आणि महाराष्ट्राच्या सुरक्षेबाबत महत्त्वाची बैठक

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १२ :



भारत-पाक युद्ध सदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सध्या देशातील बहुतांश राज्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील सुरक्षा पथक देखील सज्ज करण्यात आले आहेत. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये मॉक ड्रिल करण्यात आले. राज्य सरकार आवश्यक ती सर्व काळजी घेताना दिसत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज झालेल्या बैठकीबाबत माहिती देताना सुरक्षेच्या मुद्यावर देखील चर्चा झाली असल्याचे सांगितले आहे.

मुंबईत पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, यापूर्वी देखील आपल्या राज्य सरकारची इंटर्नल जी सिस्टम आहे त्यांच्याबरोबर मुख्यमंत्र्यांची बैठक झाली होती. परंतु आजची बैठक अतिशय महत्त्वाची होती. कारण सिव्हिल डिफेन्स, आर्मी नेव्ही, एयर फोर्स आणि कोस्ट गार्ड यांच्याबरोबर बैठक झाली. त्यात अनेक विषयांवर चर्चा झाली.

आपल्याला कुठल्याही परिस्थितीमध्ये मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहे आणि या पूर्वी देखील अतिरेक्यांनी 26/11 असेल, साखळी बॉम्ब असेल अशा प्रकारे मुंबईला टार्गेट केले होते त्यामुळे मुंबई ही फूलप्रूफ असली पाहिजे यासाठी काय काय केले पाहिजे याबाबत आजच्या बैठकीत चर्चा झाली.

शिंदे म्हणाले, आर्मी, नेव्ही, एयर फोर्स, कोस्ट गार्डला काय काय सहकार्य हवे याबद्दल चर्चा झालेली आहे. त्याचबरोबर डिफेन्स आणि राज्य सरकार कोऑर्डिनेशन असले पाहिजे यासाठी नोडल अधिकारी असले पाहिजे, याबाबतीत चर्चा झाली. जी काही माहिती येईल, इनपुट येतील, एमर्जन्सि इंटेलिजेंस येतील त्यामुळे तात्काळ त्याची माहिती आपल्या लोकांना देतील.

## सी-६० जवानांनी उद्ध्वस्त केला नक्षलवाद्यांचा तळ

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि.१२ :

माओवाद्यांचे आश्रयस्थान असलेल्या छत्तीसगड सीमेवरील भामरागड तालुक्यातील कवंडे गावात पोलिसांनी २४ तासांत पोलिस ठाणे उभारले होते. या गावालगत ११ मे रोजी माओवाद्यांनी तळ ठोकल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. त्यावरून सी-६० जवानांनी अभियान राबविले. यावेळी जवान व माओवाद्यांमध्ये जोदार धुमश्चक्री झाली. यावेळी माओवाद्यांचा तळ उद्ध्वस्त करण्यात आला. वाढता दबाव पाहून माओवाद्यांनी घटनास्थळावरून काढता पाय घेतला.

छत्तीसगड सिमेलगत पुनगुंडा, नेलगुंडा व पाठोपाठ कवंडे या गावात पोलिस ठाणे उभारण्यात आले. ११ मे रोजी काही माओवादी कवंड गावाजवळ जंगलात तळ ठोकून बसल्याची माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांना मिळाली. त्यानुसार अपर अधीक्षक एम. रमेश यांच्या नेतृत्वात सी-६० च्या २०० जवानांनी सदर जंगल परिसरात अभियान राबविले. १२ मे रोजी माओवाद्यांनी जवानांवर अंदाधुद गोळीबार केला. त्यास सी-६० जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले.

२ तासाच्या कालवधीत अधूनमधून गोळीबार झाला. पोलिसांनी आक्रम पवित्रा घेतल्यावर माओवाद्यांनी तेथून पसार झाले.



चकमकीनंतर परिसरात नक्षलविरोधी अभियान अधिक तीव्र करण्यात आले आहे. या नकमकीनंतर परिसरात शस्त्रे व साहित्य आढळून आले, ते जप्त केले आहे. माओवाद्यांचा मृतदेह आढळून आला नाही. पण ते जखमी किंवा मृत्यू झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. इतर माओवाद्यांनी त्यांना तेथून नेले असावे, अशी शक्यता आहे.
**नीलोत्पल, पोलिस अधीक्षक गडचिरोली**

परिसरात पोलिसांनी शोधमोही राबविली असता घनास्थळावरून दोन शस्त्रे जप्त केली. एक स्वयंचलित इन्सास आणि एक सिंगल शॉट रायफल, एक मॅगझिन, जिवंत काडतुसे, १ डेटोनेटर, एक रेडिओ, २ वॉकीटॉकी, २ वॉकीटॉकी चार्जर आणि मोठ्या प्रमाणात नक्षल साहित्य जप्त केले.

# काँग्रेसमुक्त भारत करताना भाजपच काँग्रेसयुक्त झाला

## हर्षवर्धन सपकाळ यांचा भाजपला टोला



**मुंबई, दि. १२ :** काँग्रेसमुक्त भारत करता करता भाजप काँग्रेसयुक्त झाला आहे, असे विधान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या एका विधानाला प्रत्युत्तर देताना हर्षवर्धन सपकाळ यांनी एक्सवर ट्विट करत भाजपवर सडकून टीका केली आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी ट्विट करत म्हटले की, काँग्रेसचे कार्यकर्ते फोडा अशी भूमिका भाजपचे प्रदेशाध्यक्ष जाहीर व्यक्त करत आहेत. पण काँग्रेसमुक्त भारत करता करता भाजप काँग्रेसयुक्त झाला आहे, हे त्यांनी अगोदर लक्षात घ्यावे. अनेक जण अडचणीमुळे भाजप पक्षात जात असले तरी अजूनही काँग्रेस संपलेली नाही यातून त्यांनी काहीतरी बोध घ्यावा. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुण्यातील भाजप पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना काँग्रेस तोडा, असे वक्तव्य केले होते. यावर हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

### काय म्हणाले होते चंद्रशेखर बावनकुळे

काँग्रेसला लोक सोडून चालली आहेत. संग्राम थोपटे यांनी सगळे काही काँग्रेसला दिले तरी सुद्धा त्यांना पक्ष सोडावा लागला. त्यांना त्यांच्या पक्षाकडून, राहुल गांधी यांच्याकडून अपेक्षा नाहीत. कुठलेही धोरण काँग्रेसला नाही. जो जो काँग्रेस किंवा इतर पार्टीमधून आमच्याकडे येईल त्याचे स्वागत आहे. काँग्रेसला फोडा, काँग्रेसला रिकामी करा. तुम्ही थकून जाल इतके जण आमच्याकडे येत आहेत. काँग्रेसची लोक आपल्याकडे आली तरी तुमचा आधी विचार करणार, असे आश्वासनही बावनकुळे यांनी दिले होते.

पुणे येथे मागच्या आठवड्यात भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक झाली होती. या बैठकीत पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांना चंद्रशेखर बावनकुळे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या अनुषंगाने संबोधित केले होते. यावेळी त्यांनी काँग्रेस तसेच महाविकास आघाडीवर टीका केली होती. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आपला पक्ष संघटना वाढवण्यासाठी सर्वच पक्ष पक्षप्रवेश करून घेत असतात. विरोधकांमध्ये स्वतःची पार्टी वाढवण्याची क्षमता आता राहिली नाही. काँग्रेस पार्टीमध्ये काही शिल्लक राहिले नाही. शरद पवार साहेबांकडे कोणी जायला तयार नाही. उद्धव ठाकरेंचा शिवबंधन तर सगळे विसरून गेले आहेत त्यांना त्यांची पार्टी सांभाळता येत नाही तर आम्ही काय करावे. शिवसेना ठाकरे गटाचे लोक आमच्या पक्षात प्रवेश करत आहेत आणि आम्हाला सांगतात की उद्धव ठाकरेंनी वक्फ बोर्डाच्या विधेयकाला विरोध केला म्हणून आम्ही तुमच्या पक्षात येत आहोत आता आम्ही काय करायला हवे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला होता.

# कुणी कुठेही गेले तरी काँग्रेसला फरक पडणार नाही

## राष्ट्रवादीच्या एकीकरणावर काँग्रेसचे विधान



**मुंबई, दि. १२ :** महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येण्याच्या चर्चेने जोर धरला आहे. यासंबंधीच्या घटनाक्रमाकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले असताना काँग्रेसने मात्र कुणी कुठेही गेले तरी आपल्याला कोणताही फरक पडणार नसल्याचे ठणकावून सांगितले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी एका मुलाखतीत भविष्यात राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आल्यास आश्चर्य वाटायला नको असे विधान केले होते. त्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी यासंबंधीचा कोणताही निर्णय कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन घेणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येण्याची चर्चा रंगली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी कुणी कुठेही गेले तरी काँग्रेसला काहीही फरक पडणार नसल्याचे ठणकावून सांगितले आहे.

### नेते वापरा व फेका हे भाजपचे धोरण

विजय वडेट्टीवार यांसंबंधी म्हणाले की, काँग्रेस सोडून सर्व पक्ष एकत्र येत असतील तर आम्ही विरोधी पक्ष म्हणून कायम राहू. काँग्रेसची विचारधारा मानणारा जनाधार ठरलेला आहे. काँग्रेस बरोबर असणारे मतदार कायम काँग्रेससोबतच राहतील. त्यामुळे कुणीही कुठेही गेले तरी काही फरक पडणार नाही. नेते वापरा व फेकून द्या असे भाजपचे धोरण आहे. कदाचित एका पक्षाचा वापर झाला असेल. त्यामुळे त्यांना दुसरा पक्ष सोबत घ्यायचा असेल. विजय वडेट्टीवार यांनी यावेळी शरद पवारांच्या भूमिकेवर भाष्य करण्यास नकार दिला. शरद पवारांची राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येण्यासंबंधी भूमिका काय आहे यावर आत्ताच भाष्य करणे योग्य होणार नाही. पण राष्ट्रवादीची भूमिका भाजपच्या डावपेचाचा एक भाग आहे. त्यातून काँग्रेसला कमकूवत करून जनमत प्रादेशिक पक्षाकडे वळवण्याचा प्रयत्न केला जात आहे. राष्ट्रीय पक्ष दुबळा झाला की प्रादेशिक पक्ष संपवण्याचे काम भाजप करते. काही दिवसांनी भाजप प्रादेशिक पक्षाचे खतपाणी बंद करते. त्यातून त्यांचा राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष संपवण्याचा हेतू साध्य होतो, असे ते म्हणाले.

### पक्षातून कचरा जात आहे तो जाऊ द्या

विजय वडेट्टीवार यांनी कोल्हापूरमधील पक्षांतरावर भाष्य करताना पक्षातून जेवढा कचरा जाईल तेवढा पक्ष स्वच्छ होईल असे मत व्यक्त केले. जेवढा कचरा जाईल तेवढा कचरा जाऊ द्या. ज्यांना सत्तेचा मोह आहे, ते त्याशिवाय राहू शकत नाही. ते सत्ताधारी पक्षात जातीलच. हा कचरा साफ झाला की, येत्या काळात नवीन लोकांना संधी मिळेल, असे ते म्हणाले.

# रोहित पवारांची शस्त्रसंधीच्या निर्णयावर शंका

## इंदिरांनी पाकचे २ तुकडे पाडल्याची आठवण काढत सांगितला बांगलादेशाच्या निर्मितीचा किस्सा



■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई, दि. १२ :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी भारत-पाकमध्ये झालेल्या शस्त्रसंधीच्या निर्णयावर शंका व्यक्त केली आहे. त्यांनी या प्रकरणी दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानचे २ तुकडे पाडल्याची आठवण करून देत बांगलादेशाच्या निर्मितीचा विस्तृत किस्सा सांगितला आहे. इंदिरा गांधी यांनी पाकचे दोन तुकडे करून बांगलादेशाची निर्मिती झाल्यानंतरच युद्धविराम घोषित केला. कारण, त्या इंदिरा गांधी अर्थात आर्यन लेडी होत्या, असे ते अप्रत्यक्षपणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टोला हाणताना म्हणालेत.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने थेट पाकिस्तानात ऑपरेशन सिंदूर राबवल्यामुळे भारत-पाकमध्ये मोठा तणाव निर्माण झाला आहे. या घटनाक्रमात भारताची बाजू वरचढ असताना अचानक अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधी अर्थात युद्धविराम घोषित केली. त्यामुळे या प्रकरणी भारतात उलटसुलट चर्चा रंगली आहे. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी इंदिरा गांधी यांची आठवण काढत सरकारच्या निर्णयावर शंका व्यक्त केली आहे.हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भेटल्यावर गरीब माणसाला गरीब जिल्ह्याचे पालकमंत्री केले, असे म्हणत त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली होती. मात्र, ह्या वक्तव्यानंतर नाराजीच्या चर्चा होत असल्याचे पाहताच त्यांनी सारवासारव केली होती.

# राज्यात सुधारित पीक विमा योजना राबवण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई, दि. १२ :** एक रुपयात पीक विमा योजनेत घोटाळा झाल्यामुळे महायुती सरकारने ही योजना बंद केली. मात्र, या योजनेच्या जागी सुधारित पीक विमा योजना सुरू करण्याचा शासनादेश अलीकडेच जारी करण्यात आला आहे. या नव्या योजनेत कोणताही घोटाळा होऊ नयेत यासाठी राज्य सरकारकडून खबरदारी घेण्यात आली आहे.




केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेअंतर्गत अंमलबजावणी यंत्रणांची निवड झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देतेवेळी मागील हंगामातील राज्य हिस्सा विमा हप्ता रकमेच्या % रक्कम, केंद्र व राज्य शासनाच्या एस्क्रो अकाउंटमध्ये जमा करण्यात येईल. यासाठी उघडावयाच्या एस्क्रो अकाउंटला मान्यता देणेबाबतचा शासन निर्णय स्वतंत्रीत्या निर्गमित करण्यात येईल, असे सांगण्यात आले आहे. पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणाऱ्या योजनेला मान्यता

शेतकऱ्यांना सक्षम बनवण्यासाठी तसेच शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवून कृषी यांत्रिकीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पाण्याचा सुयोग्य व किफायतशीर वापर करण्यासाठी शेततळे, सूक्ष्म सिंचन, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना, निकष व मापदंडांनुसार, थेट लाभ हस्तांतरण) तत्त्वावर सन २०२५-२६- पासून नवीन योजना राबवण्यास राज्य सरकारने शासनादेश जारी केला आहे. सदर योजना अत्यल्प, अल्प भूधारक, दिव्यांग आणि महिला शेतकरी याना प्रथम प्राधान्य देऊन जिल्हानिहाय लक्षांक निश्चित करून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर थेट लाभ मिळेल.

खरिपासाठी २%, रब्बीसाठी

### ५0 टक्के रक्कम केंद्र व राज्याच्या एस्क्रो खात्यात जाणार

१.५.% शेतकऱ्यांचा हिस्सा

निविदा प्रक्रिया राबवल्यानंतर प्राप्त होणाऱ्या विमा हप्ता दरांच्या तुलनात्मक माहितीच्या आधारे राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या मान्यतेने योजनेची अंमलबजावणी होणार आहे.

सन २०२५-२६च्या खरीप हंगामापासून राज्यात, सर्वसमावेशक पीक विमा योजनेमध्ये बदल करून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्वीप्रमाणे विहित केल्यानुसार, खरिपासाठी २%, रब्बीसाठी १.५.% व नगदी पिकांना ५% असा शेतकरी हिस्सा घेऊन, उर्वरित पीक हप्ता हा केंद्र व राज्य शासनामार्फत देण्यात येऊन पीक कापणी प्रयोगांवर आधारित सुधारित पीक विमा योजना राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# मंत्री नरहरी झिरवाळांची प्रकृती बिघडली मुंबईच्या सैफी रुग्णालयात दाखल



■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई, दि. १२:** राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली असून, त्यांना उपचारासाठी मुंबईतील सैफी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. झिरवाळ हे गेल्या काही दिवसांपासून किडनीच्या आजाराने त्रस्त असून, मागील आठवड्याभरापासून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू होते. मंत्री नरहरी झिरवाळ यांना आज सकाळी अचानक अस्वस्थ वाटल्यानंतर त्यांना तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले. सध्या ते सैफी रुग्णालयात उपचार घेत असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती त्यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, झिरवाळ यांना पूर्ण विश्रांती घेण्यास सांगण्यात आले आहे.

यापूर्वी ६ मे रोजी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दोन वक्तव्यामुळे झाली होती चर्चा १ मे रोजी हिंगोलीत बोलत असताना झिरवाळ यांनी राज्यातील जल जीवन मिशन योजना कुचकामी असून मापदंडाच बदल करणे गरजेचे असल्याचे म्हणत सरकारला घरचा आहेर दिला होता. त्यापूर्वी बोलताना परहरी झिरवाळ म्हणाले होते की, लाडक्या बहिणींना २१00 ऐवजी १५00 रुपयेच मिळत आहेत. तेही नियमित मिळत नसल्याने लाडक्या बहिणी नाराज आहेत. असा प्रश्न माध्यमांच्या प्रतिनिधींनी पत्रकार परिषदेत मंत्री नरहरी झिरवाळ यांना विचारला.

यावर बोलताना लाडक्या बहिणी नाराज आहेत, हे आपण सांगत असता किंवा विरोधक सांगत असतात. पण सर्व बाजूंनी लाडक्या बहिणी खूश आहेत. लाडक्या बहिणींना २१00 रुपये देण्याचे कोणीही जाहीर केलेले नाही, लाडक्या बहिणींना १५00 रुपये देखील परिपूर्ण आहेत. लाडक्या बहिणी १५00 रुपयांमध्ये खूश आहेत.

# अमेरिकेच्या हस्तक्षेपामागे मोठा सौदा

## मोदींनीच सैन्याचे पाय मागे खेचल्याचा संजय राऊत यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई, दि. १२ :** भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध परिस्थितीमध्ये अमेरिकेचा हस्तक्षेप यामागे मोठा सौदा असल्याचा संशय उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केला आहे. इतकेच नाही तर महिलांची मते मिळवण्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आले, मग पहलगाम मधील ते सहा दहशतवादी कुठे लपले? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सैनिक पुढे गेलेले असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सैन्याचे पाय खेचले असून त्यामुळे आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजीनाम्याची मागणी का करु नये? असा प्रश्न देखील संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू आहे. मात्र भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये काश्मीरच्या संदर्भात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि अमेरिकेने नाक खुपसणे हा आमच्या सार्वभौमत्वाचा सरळ सरळ अपमान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे संसदेचे विशेष अधिवेशन बोलावायला तयार नाहीत. मात्र या देशातील प्रत्येक घडामोडीची माहिती ट्रम्प यांना दिली जाते आणि त्याच्या सूचना येतात. हा संसदेचा अपमान असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या



राजीनाम्याची मागणी आम्ही का करू नये? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

### मोदींनी राजीनामा द्यावा या लोकांच्या भावना

देशाच्या अंतर्गत हल्ल्यासाठी अमित शहा जबाबदार आहेत. पहलगाम येथे २६ भारतीयांची हत्या झाली. त्याला जबाबदार देशाचे गृहमंत्री आहेत. त्यामुळे त्यांचा राजीनामा मागितला गेला. तसेच ज्या मोठ्या गर्जना केल्या गेल्या त्यामुळे आमचे सैन्य पुढे गेले. त्यांचे पाय खेचण्याचे काम नरेंद्र मोदी यांनी केले. अमेरिकेचे प्रेसिडेंट ट्रम्प यांना मध्ये घुसवले. त्याला जबाबदार पंतप्रधान कार्यालय असेल तर मोदींनी राजीनामा द्यावा या लोकांच्या भावना आहेत. तुम्ही लाहोर वरती तिरंगा फडकवण्याची भाषा केली होती. आज पाकिस्तानमध्ये विजयाचे मोर्चे निघत आहेत. एक भारतीय म्हणून त्याचे आम्हाला दुःख होणारच, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.

### हा सर्वात मोठा घोटाळा

भारतात युद्ध बंदीची घोषणा होण्याआधीच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष युद्धबंदीची पोस्टच्या माध्यमातून घोषणा करतात? हा सर्वात मोठा घोटाळा असेल असे देखील राऊत यांनी म्हटले आहे. भारतात कोणालाच माहित नाही आणि अमेरिकेचे अध्यक्ष त्याची घोषणा करतात? हे सर्व आम्हाला समजून घ्यायचे आहे. त्यासाठी विशेष अधिवेशन पाहिजे, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. २४ तासापूर्वीच अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्री आम्ही भारत -पाकिस्तान यांच्या युद्धामध्ये हस्तक्षेप करणार नाही, असे जाहीर करतात. भारत आणि पाकिस्तान आम्हाला दोन्ही सारखे आहेत, असे ते म्हणतात. आणि २४ तासाच्या आतच युद्धबंदीची घोषणा अमेरिकेतून होते? यावर संजय राऊत यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यामुळे पडद्यामागे कोणता सौदा घडला? हे या देशाला कळायला पाहिजे, अशी मागणी देखील संजय राऊत यांनी केली आहे.

# सलग पाचव्या दिवशी अवकाळी वादळी वाऱ्यासह पाऊस

■ महासागर प्रतिनिधी,
**दिंडोरी, दि. १२ :** दिंडोरी तालुक्यातील सायगाव येथे सायंकाळी पाचच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. सुमारे अर्धा तास झालेल्या मुसळधार पावसाने सायगाव परिसरात शेतात पाणी साचल्याचे पाणी पाहावयास मिळाले. सायंकाळी पाचच्या सुमारास ढगांच्या कडकडाटासह मुसळधार पावसास सुरुवात झाली. सायगाव, रामवाडी, पांजरवाडी, अंगुलगाव परिसरात पावसाने हजेरी लावली. रामवाडी परिसरात अर्धा ते पाऊण तास मुसळधार पाऊस बरसल्याने शेतात पाणीच पाणी झाल्याचे चित्र दिसून आले. या पावसामुळे शेतपिकाचे मोठे नुकसान होणार आहे. उकड्यापासून हैराण झालेल्या नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला. या पावसाने काढलेले कांदे, कांद्याचे डोंगळे, आंब्याच्या कैऱ्यांचे नुकसान झाले. काढून ठेवलेले कांदे झाकण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ उडाली. प्रतिनिधी दिंडोरी दिंडोरी तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपिटीसह अवकाळी पावसाने सलग पाचव्या दिवशी पावसाने हजेरी लावल्याने मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले. तालुक्यात



अनेक गावात बेमोसमी पावसासह गारपीट झाल्याने शेतकरी वर्गाची एकच तारांबळ उडाली. वणी, मावडी, खेडगाव, खडकसुकेणे, मोहाडी, जानोरी, जऊळके दिंडोरी, शिवनई, आंबे दिंडोरी, अक्राळे या परिसरात अर्धा तास पावसाने हजेरी लावली. रविवारी दुपारी दोन वाजता अचानक आलेल्या पावसाने शेतकऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. तालुक्यात भाजीपाला पिकांसह उन्हाळी कांद्याची काढणी सुरू असल्याने अनेक ठिकाणी शेतमाल झाकण्यासाठी शेतकरी वर्गाला मोठी कसरत करावी लागली. गेल्या पाच दिवसापासून तालुक्यात पावसाने अनेक ठिकाणी हजेरी लावल्याने शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. रविवारी दुपारी दोन वाजता झालेल्या पावसामुळे भाजीपाला विक्रेत्यांसह शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. बाजारतळात व रस्त्यालगत पाणी साचल्याने भाजीपाला व आंबा विक्रेत्यांचे हाल झाले.

## राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यावर विरोधकांनी राजकारण करू नका

# शिवसेना नेत्याचा काँग्रेसला इशारा

**मुंबई, दि. १२ :** पहलगाम हल्ला आणि त्यानंतर झालेल्या ऑपरेशन सिंदूर वरुन आता सत्ताधारी आणि विरोधी पक्षांत आरोप प्रत्यारोप सुरु झाले आहेत. या प्रकरणात युद्ध बंदीच्या घोषणेनंतर काँग्रेसच्या नेत्यांनी सरकारच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. यावरुन एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते मिलिंद देवरा यांनी पलटवार करत विरोधकांना इशारा दिला आहे.

या संबंधी देवरा म्हणाले की, परक्यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणात हस्तक्षेप करण्याचे दिवस गेले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील हे 'नवीन भारत' आहे. भारत आता पूर्णपणे सज्ज आहे, सक्षम आहे आणि दहशतवाद्यांनाच नव्हे तर दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या देशांनाही सडेतोड उत्तर देण्यास तयार आहे.

जर शेजारी देश पुन्हा अशा प्रकारचा धाडस करण्याचा प्रयत्न करतील, तर त्यांना काय परिणाम भोगावे लागतील, याची जाणीव त्यांना आहे.

# खरीपपूर्व मशागतीला वेग

## ६ लाख ४१ हजार हेक्टरवर खरिपाचा अंदाज



■ महासागर प्रतिनिधी,
**मालेगाव, दि. १२ :** मालेगाव जिल्ह्यात लाख ६१ हजार हेक्टर खरीप लागवड योग्य क्षेत्रापैकी ६ लाख ४१ हजार ७७१ क्षेत्रावर आगामी हंगामात लागवडीचे उद्दिष्ट आहे. यापैकी निव्वळ मका टक्के क्षेत्रावर पेरला जाईल असा अंदाज आहे. खरिपाच्या तयारी पूर्वीच जिल्ह्यात १ लाख ११ हजार ३३४ मे. टन रासायनिक खतांचा साठा शिल्लक आहे.

आगामी हंगामासाठी केंद्र शासनाने २ लाख २0 हजार ६0१ मे. टन रासायनिक खतांचा साठा मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे मुबलक प्रमाणात रासायनिक खते मिळणार आहेत. दोन वर्षांपूर्वी जिल्ह्यात दुष्काळ होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात खरीप हंगामाला फटका बसला. २0२४ मध्ये चांगला पाऊस झाला. यामुळे २0२३ चा दुष्काळ धुवून निघाला. परिणामी शेतकऱ्यांनी २0२४-२५- चा रब्बी हंगाम चांगला साधला आहे. आगामी खरीप हंगामासाठीही सरासरीच्या १0६ टक्के पावसाचा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

यादृष्टीने शेतकऱ्यांनीही खरीपपूर्व मशागतींना वेग दिला आहे. बागायती क्षेत्रात अद्यापही रब्बीची काढणी सुरू आहे. मे अखेरपर्यंत उशिरा लागवड झालेला उन्हाळी कांदा शेतकऱ्यांच्या हातात येईल. त्यामुळे या शेतकऱ्यांची खरीप पूर्व तयारीसाठी धावपळ होणार आहे.

मालेगाव तालुक्यात खरीपपूर्व शेती मशागत करताना शेतकरी. जिल्ह्यात १४६0 गावांपैकी १५७७ गावांच्या शिवारात खरीप लागवड होते. एकूण खरीप लागवड योग्य क्षेत्र ६ लाख ६६ हजार हेक्टर असले तरी प्रत्यक्षात २0 ते २५ हजार एकर क्षेत्रावर पेरणी होत नाही. एकूण शेतकऱ्यांपैकी ५४ टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत.

# येवल्यातील १६८२ कांदा उत्पादक, ३ कोटी ६२ लाख अनुदानापासून वंचित

## तीन वर्षानंतरही रक्कम न मिळल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचा सूर

■ महासागर प्रतिनिधी,
**येवला , दि. १२ :** कांद्याला कवडीमोल भाव मिळाल्याने २0२२ मध्ये कांदा उत्पादकांना प्रति क्विंटल ३५0 रुपये अनुदान २ वर्षांपूर्वी जाहीर करूनही तालुक्यातील १,६८२, शेतकरी अजुनही शासकीय अनुदानाच्या प्रतीक्षेत आहे. यामुळे शेतकऱ्यांत नाराजी व्यक्त केली जात आहे. खरीप व रब्बी कांद्याचे दर घसरल्याने २0२२ मध्ये कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आले होते. विरोधकांनी सरकारकडे कांदा उत्पादकांना प्रतिक्विंटल ५00 रुपयांचे अनुदान देण्याची मागणी केली होती. मात्र, राज्य सरकारने ३५0 रुपयाचे अनुदान जाहीर केले होते. या कालावधीत बाजार समितीत कमी भाव मिळालेल्या १७ हजार ७३२ कांदा उत्पादकांना अनुदानासाठी बाजार समितीने शासनाकडे प्रस्ताव पाठवले होते. यापैकी १४ हजार ४00 पात्र लाभार्थी कांदा उत्पादकांना ११ लाख ४८ हजार २३ राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये खासगी बाजार समित्यांत थेट पणन अनुज्ञप्तीधारकाकडे अथवा नाफेडकडे १ फेब्रुवारी २0२३ ते ३१ मार्च २0२३ या कालावधीत लेट खरीप हंगामातील लाल कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना रुपये ३५0 प्रति क्विंटल व जास्तीत जास्त २00 क्विंटल प्रति शेतकरी यांप्रमाणे



अनुदान मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. सातबारा उताऱ्यावर नोंद नसल्याने शासनाच्या अनुदानापासून शेतकरी वंचित राहिले होते.

याबाबत पंचनामे करत अहवाल पाठवण्याच्या शासनाने सूचना केल्या होत्या. त्यानुसार वंचित शेतकऱ्यांचा अहवाल पाठवलेला आहे. त्याबाबत पाठपुरावाही करण्यात येत आहे. - कैलास व्यापारे, सचिव, बाजार समिती, येवला क्विंटल कांद्याचे ४१ कोटी ४३ लाख ८ हजार ३२६ रुपये अनुदान बाजार समितीस प्राप्त झाल्यानंतर लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यांवर वर्ग करण्यात आले आहे. मात्र, सातबारा उताऱ्यावर कांदा पीक पेऱ्याची नोंद नसलेले व तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यकांच्या यांच्या सहीने उशीरा पंचनामा व अहवाल सादर करण्यात आलेल्या १ हजार ६४८ लाभार्थ्यांचे ३ कोटी ६२ लाख रुपये अनुदान शासनाकडून प्राप्त झालेले नाही. याबाबत उशिराने निर्णय झाल्यानंतर बाजार समितीने नव्याने प्रस्ताव करत शासनाकडे मंजुरीसाठी पाठवलेला आहे. जाचक अटी व नियमांच्या कचाट्यात अडकलेले शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले आहे.

# हृदयसम्राट सत्यसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज!

**आजच्या** बहुढंगी, बहुरंगी दुनियेत स्वत:ला ईश्वरी अवतार मानून आपले बाजारमूल्य वाढविण्याची स्पर्धा भक्तीपंथात जोमाने फोफावलेली दिसून येत आहे. या स्पर्धेतूनच अनेक पाखंडी कलंकित होत आहेत, शांती, संयम आणि औदार्य अशा त्रिगुणांच्या अनोख्या संगमामुळे संतशिरोमणी हृदयसम्माट सत्यसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी लाखो अनुयायी जोडले आणि मानवतेची पूजा करणारा निरंकारी पंथ जगभर पसरविला. संत निरंकारी मिशनमध्ये जगातील सर्व जाती-धर्माचेलोक गुण्यागोविंदाने नांदू लागले, कारण कोणाच्याही व्यक्तिगत जीवनशैली किंवा श्रद्धा भावनांना धक्का न लावता केवळ मानवतेच्या आधारावर आपुलकी, प्रेम, सद्भावना, सामंजस्याने व एकोप्याने आनंदाने जीवन जगायला शिकवणारी विचारधारा युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजींनी जोपासली व वृद्धिंगत केली. बाबाजी यथार्थ व यशस्वी मानवी जीवन जगण्याची कला शिकवत असत. त्यांनी आध्यात्मिक व भौतिक जीवनाशी अशी सुंदर सांगड घातली, त्यामुळेच जगभर ही विचारधारा लोकप्रिय बनली व हवी हवीसी वाटू लागली. कारण संतोक्तीची प्रचिती त्यांच्या पावन सान्निध्याने आली. जगतगुरू जगतवंद्य संतश्रेष्ठ तुकारामजी महाराजांनी समजाविले होते...संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या सामाजिक व आर्थिक परिषदेवर संत निरंकारी मंडळाला सल्लागाराचा दर्जा दिला. सन २0१३ मध्ये बाबाजींना गांधी ग्लोबल फॅमिलीच्या वतीने प्रतिष्ठित महात्मा गांधी सेवा मेडलने सन्मानित करण्यात आले, तर सन २0१४मध्ये गांधी शांती पुरस्कार प्रदान करण्यात आला. दि. ५ ऑगस्ट २0२५ रोजी इंग्लंडमध्ये स्वेच्छा सामाजिक सेवेसाठी देण्यात येणाजया सर्वोच्च क्वीन्स गोल्डन ज्युबिली अवॉर्डने बाबाजींना सन्मानित करण्यात आले. कारण माणसाशी माणसे जोडून मानवता धर्म स्थापित केला. संतश्रेष्ठ गोस्वामी तुलसिदासजींच्या वाणीतून प्रत्यय आला .. सत्यसम्राट हृदयसम्राट बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचा जन्म दि.२३ फेब्रुवारी १४५४ रोजी दिल्ली येथे झाला. १४७१ मध्ये त्यांनी निरंकारी सेवादलामध्ये प्राथमिक सदस्य म्हणून प्रवेश केला आणि सेवादलाची सुती खाकी वर्दी घालून सेवेचा आनंद लुटला. मध्ये त्यांनी निरंकारी युथ फोरमची स्थापना केली. या फोरमचे लक्ष्य होते, साधे व सदाचारी जीवन जगणे, प्रेम व भक्तिपूर्ण सेवा, अनावश्यक उधळपट्टीला आळा आणि नशाबंदी साधणे. २४ एप्रिल १४८0 रोजी कट्टरपंथी धमार्धांनी मिशनचे तत्कालीन प्रमुख, सद्गुरू बाबा गुरुबचन सिंहजी यांच्यावर निशाना साधून शहीद केले. तरुण बाबा हरदेवांनी शरीररुपातील सद्गुरु व पिताही गमावला होता. निरंकारी मिशनच्या प्रत्येक अनुयायाचे धैर्य, संयम आणि सहनशीलता पणाला लागावी असा तो क्षण होता. २७एप्रिल १४८0 रोजी बाबा हरदेवसिंहजींना मिशनचे सांप्रत सद्गुरू व प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले. शांती, प्रेम आणि विश्वबंधुत्व स्थापन करण्याचे आश्वासन कृतीत उतरविण्यासाठी बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी देश-विदेशांमध्येविस्तृत प्रचार यात्रा आयोजित केल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संत निरंकारी मिशन मानवता, विश्वबंधुत्व, प्रेम, शांती, समता, अहिंसा अशी महान ध्येये गाठणारी आध्यात्मिक चळवळ बनून नावारुपाला आली आहे. सर्व धर्मग्रंथांचे अमूल्य सारामृत त्यातून प्रवाहित केले.

**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**गडचिरोली. ४४२३७१४८८३.**

## पळसगाव रेती घाटावर ट्रॅक्टरवर कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. १२ मे :** चिमुर तालुक्यातील येथुन जवळच असलेल्या पळसगाव येथील घाटावर चोरट्या मार्गाने रेतीची तस्करी सुरू असताना महसुल विभागाच्या वतीने तीन ट्रॅक्टरवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. महसूल विभागाचे तलाठी कर्मचारी अधिकारी गस्तीवर असताना दिनांक ८-५-२५ ला रात्री १ वाजताच्या दरम्यान पळसगाव येथील घाटावर विना परवाना एक ब्रास रेती भरलेले ३ ट्रॅक्टर जप्त करण्यात महसूल विभागाला यश आले आहे.सदरील ट्रॅक्टर अमर गणपत सोनेकर ,विनायक सिताराम ठाकरे,अनिल गोकुल सोनेकर यांच्या मालकीच्या ट्रॅक्टर वर जप्तीची कारवाई करण्यात येवुन चिमुर तहसील कार्यालयात जमा करण्यात आले आहे सदरची कार्यवाही तहसीलदार राजमाने यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम महसूल अधिकारी स्वप्नील उमरे आदिंनी केली आहे.

## जांभुळघाट येथे जलजिवनचे काम थंडबस्त्यात

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. १२ मे :** नागपूर रेल्वे मार्गाचे काम कासव गतीने सुरू असल्याने अनेक शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे नागभीड नगर परिषद क्षेत्रात येणाऱ्या अनेक ठिकाणी बोगदे पुलाची कामे अपूर्ण आहेत. मात्र शेतकऱ्याची हंगाम सुरू होण्याची वेळ आली असताना रेल्वे ठेकेदारांनी हे काम दिलेल्या वेळेत न केल्याने अनेक शेतकऱ्यांना अडचण येणार आहे. नागभीड एम आय डी सी परिसरातून कोटगाव रस्त्यावरील बोगद्याचे काम २६एप्रिल ते १०मे पर्यंत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे होते मात्र रेल्वे ठेकेदाराने काम अर्धवट ठेवले आहे. यामुळे दुबार पेरणीच्या कामात आणि जाण्यायेण्याचा मार्ग बंद आहे हा मार्ग त्वरित सुरू करण्यासाठी शेतकऱ्यासाठी तहसीलदार प्रताप वाघमारे यांना निवेदन देण्यात येणार आहे.

# वेशांतर करुन चिमुर पोलीसांची शंकरपटाच्या जुगारावर धाड

### खुटाळा येथे शंकरटाच्या नावाखाली चालु असलेल्या जुगारावर चिमुर पोलीसाची धरपकड, वेशातर करुन चिमुर पोलीसाची दबंग कारवाई

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. १२ मे :** तालुक्यातील नेरी वरुन जवळच असलेल्या नावाजलेल्या खुटाळा गाववासीयाकडुन दरवर्षी शंकरपटाच आयोजन केल्या जाते. शंकरपट म्हटल की, शेतकरी बळीराजाचा एक उत्सवच असे समजले जाते परंतु या शंकरपटाच्या नावाखाली लाखो रुपयाचा जुगार खेळला जातो. हा जुगार नेमका कुणाच्या आशिवार्दाने चालु होता याची चर्चा तालुक्यात रंगली आहे.

या जुगारावर चिमुर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निशांत फुलेकर यांनी सापळा रचुन बारीक लक्ष ठेवत वेशांतर करुन दिनांक ११ मे ला आपल्या पथकासहित शंकरपटात गेले असता त्याठिकाणी जुगार, झंडीमुंडीच्या पडद्या मोठ्या प्रमानात दिसुन आलेत.

यावेळी निशांत फुलेकर यांनी लगेच पिच्चर स्टाईलने झंडीमुंडीच्या पडदीसह २८१० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

यावेळी धनराज गेडाम राहणार नेरी यांना २६६० नगद रोकड व इतर साहित्य असा एकूण २८१० रुपयाच्या मुद्देमालासहीत जुगार तस्करांना ताब्यात घेतले व जुगार कायद्याअंतर्गत कायदेशीर कारवाई केली.

त्यामुळे आता जुगार तस्कराचे चांगलेच धाबे दणाणले असुन आता खुटाळा येथे शंकरपटाच्या नावाखाली चालु असलेला जुगार थांबेल काय किंवा पट कमेटी जुगार धारकाना जवळ घेईल की हाकलुन लावेल याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सदरची कारवाई चिमूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक निशांत फुलेकर यांच्या उपस्थितीत सचिन साठे, निमगडे असे चार पोलिस पथकांनी सहकार्य केले. अशी माहिती चिमूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निशांत फुलेकर यांनी दैनिक महासागर जवळ दिली. पोलिसांच्या कारवाईने खळबळ उडाली आहे.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीनंतर प्रत्येकी पाच लाख रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मंजूर

### वैनगंगेत प्राण गमावणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांसाठी सरसावले आ. मुनगंटीवार, मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली मान्यता

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १२ मे :** गडचिरोली जिल्ह्यातील वैनगंगा नदीत बुडून मृत्यूमुखी पडलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पत्राद्वारे करण्यात आलेल्या मागणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ काही तासांतच या मदतीला मंजुरी दिली. याबद्दल आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले आहेत. गडचिरोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शिकणारे तिन विद्यार्थी गोपाल गणेश साखरे (बुलढाणा), पार्थ बाळासाहेब जाधव (अहिल्यानगर, शिर्डी) आणि स्वप्रिल उद्धवसिंह शिरे (छत्रपती संभाजीनगर) हे तिघे विद्यार्थी १० मे रोजी वैनगंगा नदीत पोहण्यासाठी गेले असता, दुर्दैवाने त्यांचा मृत्यू झाला. वैद्यकीय शिक्षणाच्या प्रारंभीच त्यांच्यावर काळाने घाला घातला. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत मदतीची मागणी केली होती. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत मुख्यमंत्र्यांनी काही तासातच प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे. 'या दुर्घटनेमुळे राज्यभरातून हळहळ व्यक्त होत आहे. समाजसेवेचे स्वप्न बाळगून वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश केलेल्या या तरुणांचे आयुष्य अचानक संपुष्टात आले. त्यांच्या कुटुंबांना शासनाकडून दिलासा मिळावा, हीच भावना माझी होती. यासाठी केलेल्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी त्वरित मान्यता दिली, याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे,' अशी भावना आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

# चंद्रपूर जिल्ह्यात लाडक्या बहिणीवर वाघोबाचे हल्ले

### वाघाच्या हल्ल्यात पाच दिवसात पाच महिलांचा मृत्यू

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. १२ मे :** जिल्ह्यात गत ५ दिवसात ५ महिलांना वाघोबाने यमसदनी धाडल्याने मोठी दहशत पसरली आहे. वाढत्या तापमानामुळे वन्यजीव गावकुसाबाहेर पाण्याच्या शोधात भटकंती करीत असून मानव वन्यजीव संघर्ष अधिक तीव्र झाल्याचे चित्र बघायला मिळत आहे.

चंद्रपूर जिल्हात तेंदुपत्ता संकलनास सुरुवात झाली असून आपल्या उदर निर्वाहाकरीता पुंजी जमवून ठेवण्यासाठी कामाला गेलेल्या पाच लाडक्या बहीणीवर वाघाने हल्ला करून मृत्युमुखी पाडण्याची घटना थरकाप उडवणारी ठरली आहे.

सिंदेवाही तालुक्यात तिन दिवसांपूर्वी तेंदुपत्ता संकलन करण्यासाठी जंगलात गेलेल्या तीन



महिलांवर वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना ताजी असतानाच मुल तालुक्यात महादवाडी येथे तेंदुपत्ता संकलन करण्यासाठी जंगलात गेलेल्या विमलताई शेंडे रा. नागाळा यांची वाघ हल्ल्यात मृत्यू झाला. हि घटना रविवारी चिचपल्ली प्रादेशिक वनपरिक्षेत्र कार्यालय अंतर्गत महादवाडी वन कक्षात घडली.

लगेच दुसऱ्या दिवशी मुल तालुक्यात भादुर्णा येथे घटना घडली तेंदुपत्ता संकलनास करण्यासाठी भादुर्णा येथील बफर झोन क्षेत्रातील जंगलात सोमवारी सकाळी तेंदुपत्ता वेचण्यासाठी गेली असता भुमेश्वरी दिपक भेंडारे (३०) मु.केवाडा (पेट) या महिलेला वाघाने हल्ला करून ठार केले. संघटनेची माहिती गावकऱ्यांनी वनविभागाला दिली.

घटनास्थळी वनविभागाचे अधिकारी व पोलीस विभागाचे अधिकारी दाखल होउन पंचनामा केला व शव उत्तरीय तपासणी करीता उपजिल्हा रुग्णालय मुल येथे पाठविण्यात आले, विशेष म्हणजे गत चार पाच दिवसात मुल तालुक्यामध्ये वाघ,रानडुक्करांनी लाडक्या बहिणीवर हल्ला चढवला आहे. चिरोली गावात दोन महिला व नऊ वर्ष बालीका यांच्या वर सकाळी रानडुक्करांनी हल्ला करून जखमी केले, मुल तालुक्यात आता खरीप हंगाम सुरू होत असून सतत वाघांचे हल्ले सुरू झाल्याने शेतकरी शेती करायची कशी हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे, आणखी किती बळी गेल्यावर वनविभाग व सरकार लक्ष देईल असा सवाल नागरिक करीत आहेत.

# डॉ. रितेश ठाकरे यांच्याकडून बाल सुसंस्कार शिबिरात निशुल्क सेवा




**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. १२ मे :** अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या तत्त्वप्रणाली नुसार श्री गुरुदेव सेवा मंडळ तालुका राजुरा तसेच समस्त गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने ग्रामगीता प्रणित बाल सुसंस्कार शिबिराचे आयोजन राजुरा येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय येथे दि.६ मे ते १६ मे २०२५ पर्यंत आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात सहभागी झालेल्या शीबिरार्थ्यांची निःशुल्क आरोग्य सेवा करण्यासाठी डॉ. रितेश ठाकरे यांनी पुढाकार घेत आवश्यक ती आरोग्य सेवा पुरवीत आहे. विवीध वयोगटातील मुल - मुली या शिबिरात प्रशिक्षण घेत असून पहाटे पाच ते रात्रौ दहा वाजेपर्यंत त्यांची दिनचर्या असते. यात वेगवेगळ्या प्रकारच्या शारीरीक कसरती सुद्धा शिकविल्या जाात आहे. त्यामुळें शीबिरार्थ्यांची कुठलीही शारीरिक, आरोग्यविषयक अडचणी आल्यास वेळीच योग्य ती आरोग्यसेवा निःशुल्क देऊन या शिबिराला सहकार्य देत आहेत.

डॉक्टर व्यवसायात काही डॉक्टर आपल्या दवाखान्या व्यतिरिक्त इतर ठिकाणी निशुल्क सेवा देण्यास तयार नसतात प्रत्येक ठिकाणी व्यवसाय दृष्ठिकोन ठेवून बघत असतात परंतु डॉ. रितेश ठाकरे यांच्यासारखे सेवभावी, सामाजिक बांधिलकी जोपासनारे डॉक्टर समाजात निर्माण झाल्यास सामान्य नागरिकांसाठी व समाजासाठी हितकारक ठरीत असून त्यांच्या या कार्याचे सर्वस्तरातून अभिनंदन करीत आहे.

यावेळी ह. भ. प. स्वामिनी गौरीताई विटोले, मोहनदास मेश्राम, सेवाधिकारी, श्री गुरुदेव सेवा मंडळ, राजुरा, ह.भ.प. शैलेश कावळे महाराज, देविदास वांढरे, उज्वल शेंडे, बादल बेले आदींची उपस्थिती होती. राजुरा शहरात हे शिबिर प्रथमच होत असून या शिबिरात १६० मुल मुली सहभागी झाले असुन शिबिरातील अभ्यासक्रमात सूर्यनमस्कार, योगासने, प्राणायाम, लाठीकाठी, कराटे, दांडपट्टा, मनोरे इत्यादी शारीरिक कसरतीचे प्रशिक्षण व मार्गदर्शन होत आहे.

शिबिराच्या यशस्वी आयोजनाकरीता श्री गुरुदेव सेवा मंडळ तालुका राजुरा तसेच समस्त गुरुदेव सेवा मंडळच्या वतीने अथक परिश्रम घेतले जात आहे. हे शिबिर निवासी असून शिबिरार्थ्यांना वेगवेगळ्या विषयांवर बौद्धिक मार्गदर्शन सुद्धा केल्या जात आहे.

# मुख्य रस्त्यासाठी पालगाव ग्रामस्थांचा अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या कार्यालया समोर ठिय्या

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. १२ मे :** गेल्या दोन दशकांपासून हक्काच्या व पक्का मुख्य रस्त्यासाठी पालगाव ग्रामस्थ शासन तथा अल्ट्राटेक सिमेंट कंपनी आवाळपूर मध्ये दत्तक ग्राम असल्याने मुख्य रस्त्याची मागणी करीत आहे.

सिमेंट कंपनीच्या माईन्स गेट ते पालगाव पर्यंतचा रस्ता हा पूर्णता कच्चा असल्याने धूळ व पावसाळ्यात चिखलमय होतो. गेल्या अनेक वर्षांपासून पालगाव वासियांना ये - जा करण्यासाठी नाहक त्रास करावा लागत आहे.

अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या माईनस परिसराला हा गाव लागून असल्याने माईनस मध्ये वारंवार होणाऱ्या ब्लास्टिंग मुळे गावाला



येणाऱ्या काळात धोका होऊ शकतो, सातत्याने होणाऱ्या ब्लास्टिंगने घरांना भेगा पढत असून गावाच्या पुनर्वसनाचा प्रश्न ही निर्माण होताना दिसून येत आहे.

शासन तथा अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या मॅनेजमेंटशी अनेकदा पत्र व्यवहार करुनही रस्त्याची मागणी पूर्णत्वास आली नसल्याने, व रस्त्याचे काम करण्यासाठी दिलेले आश्वासन पूर्ण न केल्याने, आज सकाळ पासून पालगाव ग्रामस्थांनी अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या मुख्य कार्यालया समोर ठिय्या मांडला असून, काय तोडगा काढणार निघणार याकडे ग्रामवासियांचे लक्ष लागले आहे.

बाखर्डी - पालगाव चे सरपंच अरुण रागीट, ग्राम.पं.सदस्य सौ.माया मडावी,रवी कुंभारे,संतोषी माऊलिकर यांच्या समवेत शेकडो पालगाव वाशी अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या मुख्य कार्यालयाच्या प्रवेशद्वारा समोर शेकडो पुरुष व स्त्रिया ठिय्या मांडून बसल्याचे चित्र दिसून येत आहे.

मात्र सद्यस्थितीत असलेले कंपनी व्यवस्थापन हे कामगारांच्या बाबतीत व दत्तक गावाच्या विकासाच्या बाबतीत मागील कित्येक वर्षांपासून उदासीन असण्याचे चित्र सर्वच दत्तक गावातील ग्रामस्थांना बघायला मिळत असून,राजकीय वरदहस्त कंपनी प्रशासनावर राहिला नसल्याचे बोलले जात आहे.

# वाघाच्या हल्ल्यात महिला ठार

### मूल तालुक्यातील भादुर्णी येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १२ मे :** मूल तालुक्यातील भादुर्णा येथील बफर झोन क्षेत्रातीत जंगलात तेंदुपत्ता तोडण्यासाठी गेली असलेल्या महिलेवर दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना सोमवारी सकाळी ७.३० वाजता दरम्यान घडली. भुमेश्वरी दिपक भेंडारे असे वाघाच्या हल्लात ठार झालेल्या महिलेचे नांव आहे.

मूल तालुक्यातील भादुर्णा येथील भाऊजी गावतुरे यांची मुलगी भुमेश्वरी हिचा विवाह केवाडा (पेठ) येथील दिपक भेंडारे सोबत झाला, काही दिवस केवाडा (पेठ) येथे राहिल्यानंतर भुमेश्वरी आपले वडीलाकडे भादुर्णा येथे राहायला आली, नंतर कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी पती—पत्नी मिळेल ते कामे करून आपला उदरनिर्वाह करीत असताना सोमवारी सकाळी तेंदुपत्ता तोडण्यासाठी आई, वडील आणि पत्तीसह बफर क्षेत्रातील भादुर्णा जंगलात सकाळी ७ वाजता दरम्यान गेली होती, तेंदुपत्ता तोडत असतानाच दबा धरून बसलेल्या वाघाने भुमेश्वरीवर झडप घेवुन हल्ला करून जागीच ठार केला, दरम्यान जवळच असलेल्या आई, वडील आणि पतीने आरडाओरड केल्याने वाघ पळुन गेला.

सदर घटनेची माहिती गावकयांना आणि वनविभागाला देण्यात आली, घटनास्थळावर वनविभागाचे आणि पोलीस प्रशासनाचे अधिकारी दाखल होवुन पंचनामा केला. व शव उत्तरीय तपासणीकरीता मूल उपजिल्हा रूग्णालयात पाठविण्यात आले.

# ६ वर्षा नंतरही आदिवासी पिडीत विद्यार्थीनी न्यायाच्या प्रतिक्षेत

### १६ मे पासून साखळी उपोषणाला शुरूवात, पत्रकार परिषदेत रमेश वेट्टी यांचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १२ मे :** राजुरा येथील इन्फंट जिजस कान्वेंट स्कूल मधील आदिवासी मुलींच्या वसतिगृहातील १८ विद्यार्थिनींच्या लैंगिक शोषणाचे प्रकरण ७ नोव्हेंबर २०१९ रोजी उघडकीस आले. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी आणि सहआरोपींविरुद्ध पोक्सो दाखल केला होता. या प्रकरणात शाळेचे संचालक आणि काही लोक अजूनही शिक्षेपासून दूर आहे. त्यांना जामीन देखिल मिळाला. ६ वर्षांनंतरही १८ मुलींना न्याय न मिळाल्याने पालकांमध्ये संताप असल्याचा आरोप करत पीडित विद्यार्थिनींचे पालक न्यायासाठी १६ मे पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण करणार असल्याचा इशारा रमेश वेट्टी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिला आहे.

वेट्टी यांनी सांगितले की, राज्य सरकारच्या निर्णयानुसार प्रतिभावान आदिवासी मुला-मुलींची प्रवेश प्रक्रिया नामांकित शाळांमध्ये घेतली जाते. त्यानुसार राजुराच्या एक प्रसिध्द खाजगी शाळेत आदिवासी मुला-मुलींची निवड प्रक्रिया घेण्यात आली. त्या निवडलेल्या मुलींना संस्थेच्या वसतिगृहात प्रवेश देण्यात आला. ही संपूर्ण प्रक्रिया एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर द्वारे चालवली गेली. परंतु २०१९ मध्ये संबंधित शाळेतील विद्यार्थिनींना जेवणात गुंगीचे औषध मिसळून अत्याचार केल्याची घटना समोर आली होती.

यानंतर विविध संघटनांनी निषेध मोर्चे काढले. पोलिसांनी या प्रकरणात कारवाई केली आणि पोक्सों गुन्हा दाखल करण्यात आला. परंतु शाळा संचालक आणि इतर आरोपींना जामीन मिळाला आहे आणि ते मोकळेपणाने फिरत आहेत. पोक्सो गुन्हा दाखल करूनही आरोपी मोकळेपणाने कसे फिरत आहेत, असा प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आला.

६ वर्षांनंतरही संबंधित मुली न्यायापासून वंचित आहेत. प्रशासन यासंदर्भात कोणत्याही प्रकार सहायता करत नसल्याचा आरोप देखिल करण्यात आला. प्रशासनाच्या दुर्लक्ष आणि दिरंगाईमुळे निराश झालेल्या १८ पीडित मुलींच्या पालकांनी न्यायासाठी १६ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण करण्याची धमकी दिली आहे. यानंतरही जर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेतले नाही तर वेळ आल्यावर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

# जनता विद्यालयाकडून पक्षांसाठी जलपत्रांचे वितरण

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**पोंभुर्णा, दि. १२ मे :** जिल्ह्यातील उष्णतेचा पारा मोठा उच्चांक गाठला असून बरेच नदी नाले कोरडे ओसाड पडले आहेत अशा कडक उन्हाळ्यात पक्षांना तृष्णा भागवता यावी व पक्षांच संवर्धन व्हावे व निसर्गाचे समतोल राखणे व विद्यार्थ्यांना निसर्ग व मानव यांचे नातं जोपासता यावं हा उद्देश ठेवून जनता विद्यालय पोंभुर्णा मुख्याध्यापक ए. बी. बघेल यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थ्यांना जलपत्राचे वितरण करण्यात आले व



शाळेजवळ असलेल्या वार्डात घरघरात जलपात्र वितरण करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांनी प्रांगणात विविध ठिकाणी जलपात्र लावले. या कार्यक्रमात राष्ट्रीय हरित सेना प्रमुख एन. एन. मत्ते, आर. ए. सावसाकडे, वाय जी पेंटेवार, पी. एम. निमसटकार, एस. एम. एलीचपूरवार, पी. एम. लोडे, आर. पी. गेडाम यांची उपस्थिती होती.

# मान्सून पुर्व तयारी नियोजन शुन्य - माजी नगर सेवक मनोज भुपाल

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. १२ मे :** ब्रह्मपुरी शहरातील चौरीकर ले आउटमधिल प्रभाग क्र. ९ मधिल पटेल नगर येथे २० ते २५ वर्षा पासून रहिवाशी असलेल्या नागरिकांच्या घरासमोरील नाल्या या जिर्ण झालेल्या अवस्थेत असून नगर परिषदने त्या नाल्याचे बांधकाम न केल्यामुळे घाण पाणी नागरिकांच्या घरात जात आहे.

आता पावसाळ्याला सुरुवात होणार तर ते येणारे घाण पाणी नागरिकांच्या घरात जाणार व आरोग्यावर परिणाम होणार आहे. नगरपरिषद ब्रह्मपुरीचे मान्सून पुर्व तयारी अजिबात दिसून येत नाही. न. प. प्रशासकीय राज असल्यामुळे कामाचे नियोजन शुन्य आहे. न. प. कारभारामुळे आम जनता त्रस्त आहे. चौरीकर ले आउट मधिल सध्या स्थितीत कमकुवत व जिर्ण झालेल्या नाल्यांच्या जागी नविन नालीचे बांधकाम करण्यात यावे व नाल्यांची तात्काळ साफसफाई करण्यात यावी. यामध्ये वैद्य-सोरते-श्रीमती बगमारे-दर्वे-जितेंद्र शेंडे-यांच्या जे. के. मॉल चे मागील बाजू तसेच सुरेश दर्वे यांच्या रिकाम्या प्लॉंट पासून ते ब्रह्मपुरी-आरमोरी मुख्य रस्ताला जोडलेला नालीपर्यंत तसेच प्रविण कराडे यांचे घराच्या कॉनरपासुन तर जनबंधु यांच्या घरासमोरील नालीची साफसफाई व ब्रह्मपुरी-आरमोरी हायवेवरील मुख्य नालीची तात्काळ आणिअति शिग्र साफसफाई करून पाण्याचा निचरा करण्यात यावा याबाबत चे निवेदन न. प. मुख्याधिकारी यांना दिले आहे.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांना मुख्य नालीचे तात्काळ अपुर्ण असलेले काम त्वरित ठेकेदाराकडून पावसाळ्याअगोदर पुर्ण करण्यात यावे, मुख्य नालीचे ठेकेदाराकडून साफसफाई करून घेण्यात यावे, ब्रह्मपुरी-आरमोरी रोड लगत रुख्मिणी सभागृह समोरील दोन्ही नाल्यातील सांडपाणी निघण्याची तात्काळ व्यवस्था करण्यात यावी याबाबतचे निवेदन नागरिकांच्या स्वाक्षरी सहित सादर करण्यात आले आहे. वरील मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन कामाला त्वरित सुरुवात करण्यात यावी. अन्यथा ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून सदर काम दुसऱ्या ठेकेदाराकडून मान्सून सुरू होण्यापूर्वी करण्यात यावे. अन्यथा आमच्या मागणी साठी रुख्मिणी सभागृह समोर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल. निवेदन देतेवेळी मनोज भुपाल मा. जी. न. से., प्रविण कराडे, अनिल बगमारे, मोरेश्वर दर्वे, किशोर भोयर, नामदेव भोयर, प्रा. डॉ. अशोक सालोटकर, प्रभाकर धकाते, दाजीबा सोनकुसरे, शिवानंद गादेवार, फारुख अन्सारी, मनोज मासुरकर, विनोद चिंचेकर, अहमद पठाण, रमेश राउत, बंडु पाठक, कुझैकर, भोयर, आदि उपस्थित होते.

# सर्व मानवजातीच्या कल्याणाकरीता सामुदायिक प्रार्थना : लटारु मत्ते

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. १२ मे :** श्री गुरुदेव सेवा मंडळ टेंबुरवाहीचे वतीने राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांची ११६ वी जयंती अर्थात ग्रामजयंती महोत्सव मोठ्या हर्षोउल्हासात साजरा करण्यात आला. प्रथमतः सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली त्यावर लटारु मत्ते मध्यवर्ती प्रतिनिधी यांनी सर्व मानवजातीच्या कल्याणाकरीता राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सामुदायिक प्रार्थणेची सुरुवात केली, त्यामुळे सर्वधर्मीय एकत्ररित्या कार्यरत असतात असे विस्तृत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ॲड.राजेंद्र जेनेकर केंद्रीय प्रचारक होते, प्रमुख अतिथी लटारु मत्ते, सुभाष पावडे ग्रामगीता परिक्षा तालुकाप्रमुख,बळीराम बोबडे अध्यक्ष जवाहरनगर,प्रल्हाद उईके जेष्ठ उपासक



रामपूर,नरेंद्र मोहारे पांढरपौणी,रवी गुरनुले तालुका प्रचारक,मधूकर भगत वरुर रोड,शामसुंदर कारेकर अध्यक्ष चिचबोडी, रत्नाकर नक्कावार कविटपेठ, उद्धवराव झाडे,सतिश साळवे, सुभाष साळवे,दिवाकर ठमके,राजेश वाटेकर अध्यक्ष यांची उपस्थिती होती. याप्रसंगी श्रीगुरुदेव अधिष्ठान व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन व माल्यार्पण केल्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी मार्गदर्शन करताना सतिश साळवे यांनी संघटन, नरेंद्र मोहारे यांनी सेवाकार्य व जबाबदारी यिवर तर सुभाष पावडे यांनी ग्रामगीता परिक्षेचे माध्यमातून विद्यार्थी घडतो व त्याचा सर्वांगिण विकास होतो,ग्रामगीता वाचत करणे काळाची गरज आहे,असे विचार व्यक्त केले, महाराजांचा ग्रामगीता ग्रंथ हा निरंतर कार्यान्वित असून ग्रंथाचे वाचन चिंतन करुन समाजोन्नती होत असते असे अध्यक्षीय मार्गदर्शन ॲड.राजेंद्र जेनेकर यांनी केले.

## टेंबुरवाही येथे ग्रामजयंती महोत्सव साजरा

याप्रसंगी मंडळाचे उत्कृष्ठ कार्याबद्दल बापूजी बोबडे, दादाजी निमकर,अर्जुन अलगमकर,उद्धव धोंगडे,बंडू झाडे,वासुदेव मडावी,बंडू मोहुर्ले,सईबाई बोबडे, सिंधूबाई सुर्तेकर,सोनुबाई निमकर, लिलाबाई बोबडे,रेखा सुर्तेकर,सचिन वाटेकर यांचा पाहुण्यांचे हस्ते राष्ट्रसंत साहित्य,पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. सुत्रसंचालन व आभार मनोहरराव बोबडे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेकरीता श्री गुरुदेव सेवा मंडळ टेंबुरवाहीचे सदस्यांनी अथक परिश्रम घेतले,राष्ट्रवंदना गायनाने सांगता करण्यात आली.

# कोणाला हवा होता युद्धविराम?

१० मे २०२५... भारत आणि पाकिस्तानमध्ये सतत ड्रोन हल्ले आणि गोळीबार होत होता. त्यानंतर संध्याकाळी ५.२५ वाजता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर ट्रूथ सोशलवर पोस्ट केले, 'भारत आणि पाकिस्तान युद्धविरामावर सहमत झाले. यानंतर, मीडिया रिपोर्ट्समध्ये युद्धविरामाबाबत अनेक सिद्धांत समोर आले. कुठे असे म्हटले जात होते की अमेरिकेला एका मोठ्या हल्ल्याची गुप्त माहिती मिळाली होती, तर कुठे पाकिस्तानने अमेरिकेकडे युद्धविरामाची विनंती केली. पाकिस्तानला किंवा भारताला युद्धविराम हवा होता का? तो अमेरिकेच्या दबावाखाली झाला का?

१० मे रोजी सकाळी, भारतीय हवाई दलाने शोरकोटमधील रफिकी, चकवालमधील मुरीद, चकलालामधील नूर खान, रहीम यार खान, सुक्कुर, कसूरमधील चुनियान, पसरूर आणि सियालकोट येथील पाकिस्तानी हवाई दलाच्या तळांवर हल्ला केला. या हल्ल्यात भारताने स्कॅल्प एअर-लाँच केलेले क्रूझ क्षेपणास्त्रे, हॅमर गाईडेड बॉम्ब आणि ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रे डागली.

भारताने पहिल्यांदाच सुखोई लढाऊ विमानातून ब्राह्मोससारख्या क्षेपणास्त्रांचा वापर केला, ज्याची रेंज २९० किमी आहे. ते २५०० किमी/तास वेगाने हल्ला करते. भारताच्या हल्ल्यामुळे पाकिस्तानला असे वाटले होते की पुढील हल्ला अणू सुविधा आणि कमांड सेंटरसह महत्त्वाच्या लष्करी ठिकाणांवर होऊ शकतो. अशा परिस्थितीत पाकिस्तानने अमेरिकेकडे मोर्चा वळवला. अमेरिकेने स्वतःला तटस्थ दाखवत इस्लामाबादवर कठोर भूमिका घेतली.

अमेरिकेने म्हटले की औपचारिक लष्करी 'हॉटलाइन' वापरून कोणताही विलंब न करता हल्ले थांबवावेत. यानंतरच, पाकिस्तानचे डीजीएमओ काशिफ अब्दुल्ला यांनी दुपारी ३.३५ वाजता भारताचे डीजीएमओ लेफ्टनंट जनरल राजीव घई यांच्याशी हॉटलाइनवर चर्चा केली. दोन्ही देशांनी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत युद्धबंदीवर सहमती दर्शवली.

अमेरिकन न्यूज नेटवर्क सीएनएननुसार, भारतीय वेळेनुसार ९ मे रोजी रात्री अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स, परराष्ट्र सचिव मार्को रुबियो आणि व्हाइट हाऊसच्या चीफ ऑफ स्टाफ सुसी विल्स भारत आणि पाकिस्तानकडून होणाऱ्या हल्ल्यांवर लक्ष ठेवून होते. दरम्यान, त्यांना गुप्त माहिती मिळाली की भारत आणि पाकिस्तानमधील सुरू असलेला संघर्ष वेगाने वाढू शकतो आणि जर असे झाले तर तो थांबवता येणार नाही. ही गुप्त माहिती मिळाल्यानंतर, अमेरिकेला वाटले की वेळ वाया न घालवता हे थांबवावे.



व्हॅन्स, रुबियो आणि विल्स यांनी संघर्ष थांबवण्यासाठी एक योजना आखली. यानंतर त्यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली आणि त्यांना त्यांची योजना सांगितली. यानंतर जेडी व्हान्स यांनी पंतप्रधान मोदींना फोन केला.

व्हॅन्स यांनी पंतप्रधान मोदींना सांगितले की अमेरिकेला वाटते की लवकरच मोठा हल्ला होण्याची शक्यता आहे. व्हान्स यांनी पंतप्रधान मोदींना पाकिस्तानशी थेट बोलण्यास आणि तणाव कमी करण्यासाठी पर्यायांवर विचार करण्यास सांगितले.

यानंतर, व्हान्स आणि रुबियो यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि एनएसए अजित डोभाल आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ, लष्करप्रमुख असीम मुनीर आणि एनएसए असीम मलिक यांच्याशी चर्चा सुरू केली, परंतु या काळात दोन्ही देशांच्या सीमेवर गोळीबार सुरूच राहिला. अमेरिकेच्या मध्यस्थीखाली अनेक फेऱ्यांच्या चर्चेनंतर दोन्ही देशांमध्ये युद्धबंदीवर सहमती झाली.

१० मे रोजी दुपारी ३:३५ वाजता, भारत आणि पाकिस्तानच्या डीजीएमओंनी हॉटलाइनवर चर्चा केली. यानंतर, ट्रम्प यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये युद्धविरामाबद्दल सांगितले. सायंकाळी ५:३० वाजता, भारताचे परराष्ट्र मंत्री विक्रम मिस्त्री यांनी पत्रकार परिषदेत युद्धविरामाची घोषणा केली.

तिसरा मतप्रवाह असा की, भारताच्या हवाई हल्ल्यानंतर तिसऱ्या दिवशी, ९ मे रोजी, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला १ अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे ८.५ हजार कोटी रुपयांचे कर्ज दिले.

आयएमएफच्या बैठकीत भारताने याला विरोध केला होता. भारताने म्हटले होते की पाकिस्तान या निधीचा वापर भारताविरुद्ध दहशतवादाला प्रोत्साहन देण्यासाठी करेल. दुसरीकडे, पाकिस्तानला या कर्जाची नितांत गरज होती कारण त्यांच्यावर सुमारे २१ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे, जे पाकिस्तानच्या एकूण जीडीपीच्या ६७% आहे. यामध्ये सुमारे ७.३ लाख कोटी रुपयांचे परकीय कर्ज समाविष्ट आहे. हे कर्ज फेडण्यासाठी पाकिस्तानला आयएमएफकडून कर्जाची आवश्यकता होती.

सूत्र सांगतात की, युद्धसदृश परिस्थितीत, आयएमएफने पाकिस्तानला कर्ज देण्याच्या बदल्यात भारताविरुद्ध युद्धविरामाची अट घातली असावी. अमेरिकेच्या संमतीशिवाय कोणतेही आयमएफकर्ज मंजूर होत नाही. अशा परिस्थितीत, पाकिस्तानला कर्ज देण्याच्या बदल्यात अमेरिकेनेच युद्धबंदीची अट घातली असण्याची शक्यता आहे.

युद्धविरामासंदर्भात चौथा मतप्रवाह चीनची मध्यस्थी दर्शवितो . ७ मे ते १० मे या कालावधीत पाकिस्तानने चिनी शस्त्रांचा वापर करून भारतावर अनेक हल्ले केले. यामध्ये जेएफ 17 विमाने, पीएल-15 क्षेपणास्त्र, एचक्यू 9 संरक्षण प्रणाली आणि अनेक ड्रोनचा समावेश आहे.

भारताचे माजी राजदूत दीपक वोहरा यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे की, भारताने विविध हवाई संरक्षण प्रणालींच्या मदतीने ही सर्व चिनी शस्त्रे पाडली, ज्यामुळे चिनी शस्त्रे जगभरात हास्याचे पात्र बनली. भारतीय सैन्याने पाकिस्तानकडून येणाऱ्या चिनी शस्त्रांचे हल्ले सतत हाणून पाडले, ज्यामुळे चीनला आपल्या शस्त्रांची प्रतिमा डागाळण्याची भीती वाटू लागली.

चीनला असे वाटले की भारताविरुद्ध या शस्त्रास्त्रांचा वापर अयशस्वी झाल्यास चीनच्या संरक्षण व्यवसायावर विपरीत परिणाम होऊ शकतो. जगात कोणीही ही शस्त्रे खरेदी करणार नाही. यामुळे चीनने पाकिस्तानला युद्धविरामाचा सल्ला दिला असावा.

स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार, २०१५ ते २०१९ पर्यंत, चीन जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र उत्पादक देश आहे. चीनने रशिया, बांगलादेश आणि म्यानमारसारख्या इतर देशांनाही ही शस्त्रे विकण्याचे सौदे केले.

युद्धबंदीबाबत आणखी एक माहिती पुढे येत आहे .सीएनएनने व्हाईट हाऊसच्या एका सूत्राचा हवाला देत म्हटले आहे की, युद्धविरामाच्या ४८ तास आधी म्हणजे ८ मेपर्यंत पाकिस्तान गप्प होता. यानंतर त्याने हल्ला करायला सुरुवात केली.

दरम्यान, मार्को रुबियो व्हाईट हाऊसमध्ये त्यांच्या टीमसोबत बसून परिस्थितीचा आढावा घेत होते. तथापि, या काळातही पाकिस्तानने रात्रीच्या वेळी भारतावर ड्रोन हल्ले सुरूच ठेवले.

भारताने इस्लामाबादजवळ तीन ठिकाणी हवाई हल्ले केले. याला प्रत्युत्तर म्हणून, संतप्त झालेल्या पाकिस्तानने भारतावर अनेक क्षेपणास्त्रे आणि रॉकेट डागले.

पाकिस्तानचा हवाला देत सीएनएनने वृत्त दिले की या हल्ल्यात पाकिस्तानने भारतीय लष्करी सुविधा, हवाई तळ आणि नियंत्रण रेषेसह शस्त्रास्त्रांच्या साठवणुकीला लक्ष्य केले. मार्को रुबियो यांच्यासोबत असलेल्या एका सूत्राचा हवाला देत सीएनएनने वृत्त दिले की, पाकिस्तानच्या हल्ल्यामुळे भारताला मागे पडावे लागले. युद्धबंदीच्या २ तास आधी, भारताने संघर्ष थांबवण्यासाठी अमेरिका, सौदी अरेबिया आणि तुर्की यांना मदतीसाठी बोलावले. यानंतर अमेरिकेने युद्धविरामाची घोषणा केली. तथापि, अमेरिकेने भारताच्या मागे पडण्याबद्दल काहीही सांगितले नाही आणि संरक्षण मंत्रालयाने घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्याचा कोणताही उल्लेखही केला नाही. युद्धबंदीबाबत वेगवेगळे मतप्रवाह असल तरी आता पाकने कुरापती केल्यास भारत सज्ज आहे.

■ ■ ■

# जनामनातून प्रगटीत व्हावे ही बुध्दाची निती!



बुध्दाचं तत्वज्ञान म्हणजे शांतपणे, ठामपणे पण अन्यायाला विरोध करणं आणि समानतेसाठी लढणं. बुध्दमुर्ती केवळ धार्मिक नाही तर ती सामाजिक न्याय आणि समानतेची प्रेरणा आहे. आज समाजाचे एकंदर चित्र पाहिल्यावर असे दिसते की, समाज हा गरीबी, अज्ञान, अंधश्रध्दा, भ्रष्टाचार, पिळवणूक, लोभ, अनैतिकता यांनी ग्रासित झाला आहे.

अशा अशुध्द मानव निर्मित वातावरणात व्यक्तीचा विकास साधणे अशक्यप्राय गोष्ट आहे. मग अशा समाजाचा विकास कितीही साधण्याचा प्रयत्न केला तरी विकास साधता येत नाही. कारण त्या ठिकाणी व्यक्तीच्या विकासाची काहीही तरतूद नाही, म्हणून असा समाज अविकसित असतो. व्यक्ती विकासाला पूर्णपणे स्वातंत्र्य देवून समाज हा विकसित व सुसंस्कृत बनविण्याचा मार्ग म्हणजे भगवान बुध्दांनी सांगितलेला आर्य अष्टांगिक मार्ग आहे. सम्यकदृष्टि, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्मान्त, सम्यक आजिविका, सम्यक व्यायत, सम्यक स्मृति व सम्यक समाधी या अंगानी परिपूर्ण असलेल्या मार्गाला भगवान बुध्द आर्य मार्ग संबोधतात. अष्टांगिक मागार्ला संपूर्ण तत्वज्ञानाचा गाभा मानल्या जातो. त्यामुळेच व्यक्तीचा सर्वांगिण विकास उपरोक्त मार्गानुसार आचरण केल्यास निब्बाण प्राप्त करता येते.

भोग आणि क्लेश ही जीवनाची आत्यंतिक दोन टोके टाळून यामधला सुलभ, सरळ ज्ञानाचा सन्मार्ग म्हणजे तथागतांचा मध्यममार्ग होय. या मध्यममागार्चा तथागतांनी केलेल्या शिकवणीचा उपदेश म्हणजे धम्म. सर्वप्रथम वैशाख पौर्णिमेचे महत्व समजावून घेणे आवश्यक आहे, कारण या दिवशी सिध्दार्थ गौतमाचा जन्म, ज्ञानप्राप्ती व महापरिनिर्वाण या तीनही घटना वैशाख पौर्णिमेच्याच दिवशी घडतात ही काही साधारण बाब नाही, हा चमत्कार ही नाही. याला एक आगळं-वेगळं महत्व आहे, ही वस्तुस्थिती आहे, हे सत्य कोणीही नाकारु शकत नाही. ज्यांचा आज आपण जन्मोत्सव साजरा करीत आहोत, अशा स्थितप्रज्ञ महामानवास त्रिवार वंदन.

विश्वबंधुत्व, समानता व मानवी स्वातंत्र्य, एकमेकांविषयी प्रेम भावना, करुणेची भावना इत्यादि मानवाच्या कल्याणासाठी हितकारक गुणतत्वे जोपासणाऱ्या विज्ञाननिष्ठ, तर्कशुध्द, निर्भेड व विशुध्द जीवन मार्गावर आधारित अलौकिक अशा पवित्र धम्माची स्थापना करणारे जगातील पहिले क्रांतिकारी महामानव म्हणजेच तथागत भगवान गौतम बुध्द होत.



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

सिध्दार्थ गौतमाने रोहिणी नदीच्या वादातून गृहत्याग केला व परिव्रजा घेतली. कपिलवस्तुहून राजगृहास आले असता मगधधिपती राजा बिंबीसार यांनी त्याची भेट घेतली. राजा बिंबीसार यांनी सिध्दार्थ गौतमास ऐहीक सुखोपभोगाबाबत उपदेश केला आपण पुन्हा कपिलवस्तुत परतुन राज्योपभोग घ्यावा, तेथे जाणे उचित वाटत नसल्यास मी माझे अर्धे राज्य आपणांस देतो तेथे आपण राज्य करावे अशी विनंती केली, परंतू संन्यासाचा जीवन मार्ग अवलंबू नये.

तद्प्रसंगी सिध्दाथार्ने राजा बिंबीसारला विचारपुर्वक गांभीयार्ने खणखणीत उत्तर दिले सुख म्हणजे उपभोग, असे सर्वसाधारण मानले जाते. कसोटीला लागल्यास त्यापैकी एकही उपभोगण्याच्या योग्यतेचे आहे असे आढळत नाही. तहान भागविण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते, तसेच भुक शमविण्यासाठी अन्न हवे असते आपली नग्नता झाकण्यासाठी व थंडी वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी कपडयांची आवश्यकता असते, झोपेची गुंगी घालविण्यासाठी बिछाना असतो, प्रवासाचा शीण होवू नये म्हणून वाहन असते उभे राहण्याचा त्रास कमी करण्यासाठी आसन असते. तसेच शरीराची शुध्दी, आरोग्य यासाठी स्नान एक साधन असते.

फक्त बाहय वस्तु म्हणजेच मानवाच्या दुःख निवारण्याची साधने नव्हती. म्हणून अन्न-वस्त्र-निवारा इत्यादी मुलभुत गरजांना प्राधान्य न देता मानवी कल्याणाचा सुखाचा शोध घेण्यासाठी ज्ञान अर्थात शिक्षण महत्वाचे असते. मिळविलेल्या ज्ञान चिंतनातून मानवाच्या कल्याणासाठी खास जीवनमार्ग शोधला ज्ञानाने व्यक्तीचा सवार्गीण विकास घडविण्यास मदत होते, हा संदेश संपुर्ण विश्वाला तथागताने दिला.

व्यक्ति विकासासाठी मानवास शिक्षणाचे-ज्ञानाचे महत्व किती आहे, हे आपल्या देशातील अनेक महामानवाने जाणले. मानवाचे कल्याण त्याचे सुख कशात आहे. याचा शोध घेता महामानवांना आढळले की, प्रथम प्रत्येक व्यक्ति ही शिक्षित- ज्ञानी झाली पाहिजेत. शिक्षणज्ञान मानवाच्या कल्याणाचे, सुखाचे प्रमुख अंग आहे. त्याचा विकासत राजमार्ग आहे, हा राजमार्ग सर्वप्रथम जगाला दाखविला महाकारुणिक गौतम बुध्दाने.

भगवान बुध्दांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू आहेत. त्यांच्या विविध पैलूंचा अभ्यास विविध अंगानी व विविध दृष्टीकोणातून होणे आज आवश्यक आहे. तथागत बुध्दाच्या व्यक्तीमत्वामध्ये ज्याप्रमाणे चुंबकीय तत्व होते, त्याचप्रमाणे त्यांचे तत्वज्ञानामध्ये असे चुंबकीय तत्व होते की, ज्यामुळे असंख्य लोक त्यांच्या व्यक्तीमत्वाने प्रभावित झालेले होतेच.

परंतू त्याही पेक्षा कितीतरी पटीने त्यांच्या तत्वज्ञानाने, त्यांच्या तत्वज्ञानातील सभ्यतेने प्रभावित होऊन त्यांनी त्याचे अनुयायीत्व स्विकारलेले होते. या काळात बहुसंख्य जनतेची संपर्क भाषा ही प्राकृतच राहिली. प्राकृत ही लोकभाषा असल्याने तथागत गौतम बुध्दांनी आपले सर्व ज्ञान त्याकाळाची लोकभाषा असलेल्या पालीतूनच दिल्याचे स्पष्टपणे आढळते.

बुध्दाच्या व्यक्तिमत्वाची छाप व त्यांच्या तत्वज्ञानाची पकड इतकी मजबुत आहे की, भारत भुमीच्या या महापुत्राने केवळ भारताचाच नव्हे तर संपुर्ण विश्वालाच प्रभावित केलेले आहे. भारताच्या इतिहासामध्ये एवढा प्रतिभा संपन्न, प्रखर बुध्दिवादी, ध्येयवादी व मानवतावादी अजून कधी झालेला नाही. यापुढे देखील होणे नाही ज्याला संपुर्ण जग सन्मानपुर्वक विनम्र होत असते. बुध्द हा अशा स्वयं प्रज्ञेचा माणुस होता की, ज्याने जगाला पहिल्यांदा प्रखर बुध्दिवादाची व ध्येयवादाची शिकवण दिली.

भगवान बुध्द म्हणतात, अत्त-दिपो-भव, अत्त-विरहत, अत्त-सरणी अर्थात हे मानव प्राण्यांनो स्वतःचे दिप व्हा, स्वयं प्रकाशित व्हा आणि स्वतःला शरण जावून स्वतःचच विचरण करा, दुसऱ्या कुणालाही शरण जावू नका, दुसरा कुणीही तुम्हाला शरण जाण्या योग्य नाही तुम्ही स्वतःच स्वतःचे शरणस्थान आहात, यामध्ये जगाच्या सभ्यतेचा व संस्कृतीच्या इतिहासामध्ये भगवान बुध्दाने पहिल्यांदा मनुष्याला परा प्रवृत्ती, दैव, ईश्वर, आत्मा परमात्मा संकल्पना पासून मुक्त होण्याचा महामंत्र दिला व तो जोपासून ठेवणे ही आजच्या काळाची गरज आहे.

धम्म हा जीवनाच्या विविधांगी पैलूंना स्पर्श करणारा असतो. केवळ वैयक्तिक मोक्षप्राप्ती नसुन इतर सर्व मानवाला मोक्षदाता म्हणुन हितकारक व लाभदायी ठरणारा असतो. म्हणूनच सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, नौतिकमूल्ये अशा सर्वच बाबींना स्पर्श करणारा तो मोठा वर्तुळ परिघ ठरतो. ह्लबुध्द आणि कार्ल मार्क्स" या विषयी काठमांडू येथील विवेचनपूर्ण भाषणात त्यांनी समाजाला पयार्याने प्रत्येक व्यक्तिला धम्माची नितांत गरज असल्याचे सांगीतले.

धर्म ही अफुची गोळी आहे, ही कम्युनिस्टांची धारणा फोल ठरविली. जगातील सर्वधर्म सारखेच आहेत ही धारणाही त्यांनी उखडून फेकली. बुध्दाचा धम्म हा आकाशातील अनेक ताऱ्यांपैकी कसा वेगळा आहे, त्याचे तेज कसे वेगळे आणि दैदिप्यमान आहे, हे सत्य जाणून घेण्यासाठी त्यांनी सर्वांना आवाहन केले होते हे विसरता येत नाही. जिथं अध्यात्म संपते, तिथं विज्ञान सुरु होते आणि हेच सत्य तथागतांनी सांगितले.

बुध्दाचे चरित्र आणि चारित्र्य निर्मळ पाण्याच्या प्रवाहासारखे होते. तो करुणेचा महासागर होता, रंजल्या गांजल्यांचा तो कैवारी, सखा, मित्र आणि मार्गदर्शक होता. जगाच्या इतिहासात अशी माणसे अपवादात्मक असतात अशा सम्यक सम्बुध्दाला अनुसरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आमच्या पुढे सर्जनशील आदर्श निर्माण केला. बुध्द-बाबासाहेब हे आमच्या सर्वकष मुक्तीचे मार्गदर्शक आहेत. त्यांनी आम्हाला सन्मार्ग उपलब्ध करुन दिला आहे, मार्गक्रमण आम्हाला करावयाचे आहे. त्यासाठी स्वयं प्रकाशित होवून आम्ही बुध्द-धम्म व संघ यांच्या प्रती एकनिष्ठ राहून धम्मचक्र प्रवर्तनाची सम्यक क्रांती गतीमान ठेवली पाहिजे.

■ ■ ■

# अवामी लीग वर बंदी कशासाठी?

बांगलादेश मधील अवामी लीग या सर्वात जुन्या आणि सर्वात मोठ्या पक्षाची स्थापना १९४९ साली झाली.गेल्यावर्षी या पक्षाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाली.या पक्षाने १९५२ साली झालेल्या भाषीक आंदोलनात मोठ्या प्रमाणात भाग घेतला होता. पुर्वीच्या पूर्व पाकिस्तानवर जेंव्हा पश्चिम पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी उर्दू भाषेची सक्ती केली तेंव्हा विरोध करण्यासाठी अवामी लीगच्या नेतृत्वाखाली मोठे आंदोलन उभारण्यात आले.त्या आंदोलकांवर पोलीसांनी केलेल्या गोळीबारात अनेक आंदोलक मृत्यूमुखी पडले होते.

पूर्व पाकिस्तानातील जनतेला आपली मातृभाषा (बंगाली) अतिशय प्रिय असल्याने, त्यांनी उर्दू भाषेच्या सक्तीला प्राणपणाने विरोध केला होता.पूर्व पाकिस्तान फार काळ पाकिस्तानचा भाग म्हणून राहणार नाही याची प्रचिती १९५२ मधील भाषिक आंदोलनामुळे आली. भाषिक आंदोलनाचे नेतृत्व अवामी लीगने केल्यानंतर, अवामी लीगच्या पाठीराख्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. अवामी लीगला शेख मुजीबर रेहमान यांच्या सारखे समर्थ नेतृत्व लाभल्यामुळे त्यानंतर झालेल्या आंदोलनांचे नेतृत्व अवामी लीगने केले.

१९६९ साली पाकिस्तान मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत पाकिस्तानच्या नॅशनल असेंब्लीत अवामी लीगला बहुमत मिळाले आणि सरकार स्थापन करण्यासाठी आपल्याला निमंत्रण मिळेल अशी आशा बाळगणाऱ्या अवामी लीगची मोठीच निराशा झाली. पूर्व पाकिस्तानातील नेत्याला पाकिस्तानचे पंतप्रधानपद मिळून द्यायचे नाही या इर्षेने पेटलेल्या याह्याखान आणि भुत्तो यांनी अवामी लीगचे नेते शेख मुजीबर रेहमान यांना सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित केले नाही.

अवामी लीगच्या नेतृत्वाने, पाकिस्तानी सरकार समोर काही मागण्या मांडल्या होत्या,त्या मागण्या मान्य न झाल्याने अवामी लीगच्या नेतृत्वाखाली पूर्व पाकिस्तान मध्ये मोठे जनआंदोलन उभारण्यात आले. ते आंदोलन पोलिसी बळाच्या सहाय्याने चिरडण्याचा निर्णय याह्याखानने घेतला आणि ऑपरेशन सर्च लाईटच्या मोहीमेंतर्गत पूर्व पाकिस्तानात नरसंहार घडवून आणला. त्यानंतर अवामी लीग आणि मुक्तिवाहिनीने पाकिस्तानी लष्करासमोर कडवे आव्हान उभे केले.नंतर भारताने या संघर्षात मुक्तिवाहिनीला सर्व प्रकारची मदत केल्यामुळे पाकिस्तानी लष्कराला शरण यावे लागले आणि स्वतंत्र बांगलादेशची निर्मिती झाली.

अशा प्रकारे बांगलादेशला स्वातंत्र्य मिळवून देण्यात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अवामी लीग या पक्षावर बांगलादेशातील काळजीवाहू सरकारने बंदी घातल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे.

बांगलादेशचे राष्ट्रपिता शेख मुजीबर रेहमान यांची १९७५ मध्ये हत्या झाली, ऑगस्ट २०२५ मध्ये त्या घटनेला ५० वर्षे पूर्ण होतील. बांगलादेश मधील सध्याचे काळजीवाहू सरकार कट्टरवाद्यांच्या दबावाखाली येऊन निरनिराळे निर्णय घेत आहे. शेख मुजीबर रेहमान यांना बदनाम करण्याची मोहीम या कट्टरवाद्यांनी चालवली असून, शेख मुजिबर रेहमान यांच्या घराची नासधूस केली व त्यांचे पुतळे जमीनदोस्त केले होते.



अभय गोखले

शेख मुजीबर रेहमान यांचा फोटो बांगलादेशच्या करन्सी नोटांवरुन हटविण्याचा निर्णय सरकारने घेतल्यानंतर बांगलादेश मध्ये नोटांची टंचाई निर्माण झाली असून, नवीन नोटा चलनात येईपर्यंत ही टंचाई कायम राहण्याची शक्यता आहे.

अवामी लीग या पक्षावर बंदी घालण्याची मागणी जमाते इस्लामी, नॅशनल सिटिझन्स पार्टी आणि इतर संघटनांकडून बऱ्याच दिवसांपासून होत होती. त्याकरीता ढाका येथे या संघटनांनी आंदोलन सुरू केले होते. त्यांनी सरकारला निर्वाणीचा इशारा दिला होता. अखेर त्यांच्या पुढे नमते घेऊन सरकारने अवामी लीग वर बंदी घालण्याचा निर्णय जाहीर केला. दहशतवाद विरोधी कायद्यांतर्गत अवामी लीग वर बंदी घालण्यात आली आहे. यापुर्वी ऑक्टोबर २०२४ मध्ये अवामी लीगच्या विद्यार्थी संघटनेवर बंदी घालण्यात आली होती.

जुलै २०२४ मध्ये आरक्षण विरोधी जे आंदोलन बांगलादेश मधील विद्यार्थी आणि इतर नागरीकांनी पुकारले होते, त्याला हिंसक वळण लागले आणि त्यानंतर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात अनेक आंदोलक मृत्यूमुखी पडले. त्याबद्दल शेख हसीना आणि अवामी लीग या पक्षाला दोषी ठरवून त्यांच्यावर न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत, त्या खटल्यांचा निकाल लागेपर्यंत अवामी लीग वरील बंदी कायम राहणार आहे.

सध्या बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना या भारतामध्ये वास्तव्य करत आहेत.त्यांचा ताबा मिळवण्यासाठी बांगलादेश कडून अनेक वेळा मागणी करण्यात आली आहे.अवामी लीगचे अनेक नेते बांगलादेश बाहेर पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खलेदा झिया या नुकत्याच बांगलादेश मध्ये परतल्या आहेत. बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने,अवामी लीग वरील बंदीचे स्वागत केले आहे.

आरक्षण विरोधी आंदोलनात पुढाकार घेतलेल्या विद्यार्थी नेत्यांनी नॅशनल सिटिझन्स पार्टी या पक्षाची स्थापना केली आहे.या पक्षाने लवकरात लवकर बांगलादेश मध्ये निवडणुका घेण्याची मागणी लावून धरली आहे. खलेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीनेही निवडणुका लवकरात लवकर घेण्याची मागणी केली आहे.मात्र काळजीवाहू सरकारचे मुख्य सल्लागार मोहंमद युनूस यांनी आधी सुधारणा आणि नंतर निवडणूका असा पवित्रा घेतला आहे. त्यावरून सरकार आणि राजकीय पक्ष यांच्यात संघर्ष झाल्यास परिस्थिती चिघळू शकेल आणि लष्कर प्रमुखांना त्यात हस्तक्षेप करावा लागेल.

गेली १५ वर्षे बांगलादेशमध्ये जो पक्ष सत्तेवर होता, त्या पक्षावर (अवामी लीग) बंदी घालण्यात आल्याने, त्याचे विरोधक जरी खूष असले तरी निकोप लोकशाहीसाठी ही गोष्ट चांगली नाही. शेख हसीना या बांगलादेशच्या पंतप्रधान असताना त्यांनी सर्व लोकशाही मुल्ये धाब्यावर बसवून गैरमार्गाने निवडणुका जिंकल्या होत्या. सर्वात मोठा विरोधी पक्ष असलेल्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने निवडणूकांवर बहिष्कार घातल्याने त्या निवडणुकांना काही अर्थ उरला नव्हता. आता अवामी लीगवर बंदी घालण्यात आल्याने, जेंव्हा निवडणुका होतील तेव्हा तो पक्ष निवडणूक रिंगणात नसणार. अशा परिस्थितीत त्या निवडणूकांना काय अर्थ असेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही. ■ ■

## वाचक लिहितात

### पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण व्हावीत

नागपूर शहराच्या अनेक भागात उड्डाणपुल, मेट्रो, सिमेंट रस्ते अशी अनेक कामे गेल्या अनेक वर्षापासून सुरू आहेत. कामाच्या ठिकाणी अवजड वाहने उभी असतात. परिणामी, वाहतुकीची कोंडी होणे, ही मोठी समस्या आहे. तासन्तास वाहनचालकांना अडकून पडावे लागते. पुढील काही दिवसात पावसाळा सुरू होणार असून, कामे पूर्ण झाली नाही तर ही समस्या अधिक गंभीर रूप धारण करेल.

■ विजय नारनवरे, नागपूर.

### शतचंडी यज्ञाचे महत्त्व

शतचंडी यज्ञाचे महत्त्व विविध दृष्टीने आहे. आध्यात्मिक दृष्टिकोनातून, हा यज्ञ दुर्गादेवीच्या शक्तीचे आवाहन करतो. देवीच्या सप्तशतीचे पठण म्हणजेच चंडीपाठ हा नकारात्मक शक्तींवर विजय मिळविण्याचे साधन मानला जातो. देशाच्या आणि सैनिकांच्या रक्षणासाठी तसेच विजयासाठी, राष्ट्रीय ऐक्यासाठी शक्तिप्रदायक ठरतो. धार्मिक एकात्मतेचे प्रतीक म्हणून, विविध संप्रदायांचे संत, भक्त, साधक, मंत्री व हिंदुधर्मप्रेमी या यज्ञात एकत्र येत आहेत. हे समाजातील धार्मिक ऐक्याचे जिवंत उदाहरण आहे. सांस्कृतिक आणि आध्यात्मिक पुनरुत्थानाचे केंद्र म्हणून शतचंडी यज्ञ कार्य करतो. हिंदु संस्कृतीतील यज्ञसंस्कार हे केवळ कर्मकांड नव्हे, तर आत्मशुद्धी आणि राष्ट्रशुद्धीचे प्रभावी माध्यम आहे. सनातन राष्ट्र स्थापनेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून फोंडा, गोवा येथे २० ते २२ मे २०२५ या कालावधीत शतचंडी यज्ञाचे आयोजन करण्यात आले असल्याचे कळले. या यज्ञात २५ विद्वान पुरोहितांच्या द्वारे करण्यात येणार आहे. या महान यज्ञात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा यज्ञ निर्विघ्नपणे पार पडावा आणि आपल्या राष्ट्राचे तसेच सैनिकांचे रक्षण व्हावे हीच प्रार्थना!

■ हृषीकेश हरदास, वर्धा.

# उन्हाळ्यात टाळा हे पाच प्रकारचे पदार्थ



उन्हाळ्यातील तीव्र सूर्यप्रकाशामुळे डिहायड्रेशनची समस्या उद्भवते. यामुळे आपल्या उष्मघाताचा त्रास होऊ शकतो. यासाठी उष्माघात टाळण्यासाठी, थंडावा देणारे पाणीयुक्त पदार्थ आहारात समाविष्ट करावेत. विशेषतः आहाराकडे जास्तीत जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. लोकं निरोगी राहण्यासाठी उन्हाळ्यात काकडी, कांदा, कलिंगड, इत्यादी पदार्थ जास्त खातात, परंतु याव्यतिरिक्त असे काही पदार्थ आहेत ज्यांच्या सेवनाने शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होऊ शकते आणि तुम्ही डिहायड्रेशनचा बळी होऊ शकता, ज्यामुळे उष्माघाताचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो.

जेव्हा एखाद्याला उष्माघात होतो तेव्हा जलद श्वास घेणे, अस्वस्थता, शरीराचे तापमान वाढणे, उलट्या होणे, मळमळ होणे, अतिसार, चक्कर येणे अशी लक्षणे दिसतात, ज्याकडे दुर्लक्ष करू नये. उष्माघात टाळण्यासाठी, शक्य तितके कमी उन्हात बाहेर जाणे आणि योग्य आहार घेणे महत्वाचे आहे. तुमच्या शरीराला डिहायड्रेट करणारे कोणते पदार्थ आहेत ते आपण जाणून घेणार आहोत.

**कोल्ड्रिंक्स :** उन्हाळ्याच्या दिवसात लोकं थंड पेये खूप पितात, कारण ते त्वरित शरीराला आराम देतात. परंतु, जास्त कोल्ड्रिंक्स पिण्याने शरीर डिहायड्रेट होवून उष्माघाताचा धोका वाढतो.

**कॅफिन :** अनेकदा चहा आणि कॉफी प्रेमी असे म्हणत असतात की तापमान कितीही वाढले तरी ते चहा आणि कॉफी सोडू शकत नाहीत. चहा आणि कॉफीमध्ये कॅफिन असते जे शरीराला डिहायड्रेट करू शकते, म्हणून उन्हाळ्यात चहा आणि कॉफीचे सेवन मर्यादित प्रमाणात करावे.

**जास्त मीठ असलेले अन्न :** लोकं जेवणात मीठ मर्यादित ठेवतात पण जेवणाच्या वेळी ते चिप्स आणि नमकीन सारखे पॅकबंद पदार्थ खातात. या सर्व गोष्टींमध्ये मीठाचे प्रमाण खूप जास्त असते आणि त्यामुळे तुमचे शरीर डिहायड्रेट होऊ शकते.

**तळलेले पदार्थ :** उन्हाळ्यात तळलेले पदार्थांचे सेवन देखील टाळावेत. हे पदार्थ पचायला जड असतात. यामुळे पोटात जडपणा जाणवतो आणि डिहायड्रेशन देखील होऊ शकते. खरं तर, फॅट पचवण्यासाठी शरीराला भरपूर पाण्याची आवश्यकता असते.


**मसालेदार तेलकट पदार्थ :** उन्हाळ्यात आहारात लोणचे, मांसाहारी पदार्थ, मसाला पापड इत्यादी फॅटयुक्त मसालेदार पदार्थांचा समावेश कमी करावा. कारण या पदार्थांचे सेवन केल्यानंतर शरीर डिहायड्रेटेड होऊ शकते. हे पदार्थ खाल्ल्यानंतर तुम्हाला पुन्हा पुन्हा तहान लागेल. हे डिहायड्रेशनचे लक्षण आहे.

**हे पदार्थ खात राहा**

उष्माघात टाळण्यासाठी काकडी, सॅलड, कच्चा कांदा, ताक, नारळ पाणी, लिंबूपाणी, बडीशेपचा सरबत यांसारखे पेये आहाराचा भाग बनवावेत. जेणेकरून शरीरातील पाणी कमी होणार नाही.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### बुद्धम् शरणम!

पंचशिल तत्वांचे
करता पालन
बनते पाण्यासारखे
निर्मल जीवन...

पृथ्वीच रूपांतरीत
होईल स्वर्गात
जर मानवाने पंचशिल
आणली आचरणात ...

शांती समाधानाविना
जीवन झालेय अस्वस्थ
अष्टांग मार्गाचा कर स्विकार
मुक्तिकडे होशील मार्गस्थ...

## स्वतः खर्चातून ओमप्रकाश गनोरकर यांनी तुकूम तलावाचे वेस्टवेअर दुरुस्ती



**नेरी, दि. १२ मे :** तुकूम तलावाचे वेस्टवेअर ना दुरुस्त असल्यामुळे शेतकऱ्यांना शेत पिकांना पाणी मिळण्यास अडचण निर्माण झालेली होती. शेतकऱ्यांनी वेस्ट वेअरची अडचण भाजप नेते तथा टेकेपारचे माजी सरपंच ओमप्रकाश गनोरकर यांनी सांगितले. तेव्हा ओमप्रकाश गनोरकर यांनी स्वखर्चातून जेसीबी लावून खोदकाम करीत वेस्टवेअर दुरुस्ती करून दिला. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात पाणी मिळणे सोईचे होणार आहे. शेतकऱ्यांनी ओमप्रकाश गनोरकर यांच्या कार्या बद्दल स्तुती केली.तसेच आभार व्यक्त केले

## मेंडकी जि.प.शाळेच्या मुलांचे सुयश

**महासागर शहर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. १२ मे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद मार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मेंडकी येथील नऊ विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले. मेंडकी शाळेने याही पुढे जात उज्वल यशाची परंपरा निर्माण करत इयत्ता ५ वी पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत दिशांत सुभाष आत्राम, नकुल मोरेश्वर वासनिक, प्रज्वल दीपक ठाकरे,पियुष संजय पगाडे, देवर्ष फाल्गुन आंबोरकर, सान्वी सुनील दुधे, देव्या गुरुदेव वाघु ळकर., संबोधि देवेंद्र चौधरी, फाल्गुनी प्रकाश दोनकोंडावार हे ९ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले. नवोदय परीक्षा, एकलव्य परीक्षा तथा शिष्यवृत्ती परीक्षेसाठी शाळेतील कु. नलिना शहारे या वर्ग शिक्षिकेंनी मार्गदर्शन केले.

# विठ्ठलवाडा येथील पाणीपुरवठा योजना पाच दिवसांपासून ठप्प

**प्रमोद दुर्गे**

**गोंडपिपरी, दि. १२ मे :** पाच दिवसांपासून विठ्ठलवाडा येथील पाणीपुरवठा योजना बंद असल्याने नवेगाव , कोरंबी, चेक विठ्ठलवाडा, तारसा बूज , तारसा खुर्द, नांदगाव,येंनबोथला आणि विठ्ठलवाडा गावात जल संकट निर्माण झाले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकन्याची वेळ ग्रामस्थावर आली आहे.

जल हे जीवन आहे, पाण्याशिवाय जगणं कठीण असे असतानाच गोंडपिपरी तालुक्यातील विठ्ठलवाडा येथील पाणीपुरवठा योजना मोटार जळाल्याने पाच दिवसांपासून ठप्प पडली आहे.याचा त्रास ग्रामस्थांना सहन करावा लागत आहे.

ाागरिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी पाणीपुरवठा योजने अंतर्गत विठ्ठलवाडा येथे पाण्याची टाकी उभारण्यात आली, सोबतच 'हर घर नल हर घर जल ' योजने अंतर्गत गावातील नागरिकांना नळ जोडणी करण्यात आली नदी पात्रातून पाईप द्वारे फिल्टर प्लांट मध्ये नदीतील पाण्याचे शुध्दीकरण करून नळाद्वारे गावागावात पाण्याचा पुरवठा केला जात असतानाच मोटार जळल्याने पाच दिवसांपासून नळ कोरडे पडले आहेत.

परिणामी सात गावावर जलसंकट कोसळले आहे, पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना वण वण भटकावे लागत आहे.

उन्हाळ्याचे दिवस सुरू असूनही नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याने पाणी पुरवठा योजनेचे फज्जा उडाल्याचे चित्र दिसून येत आहे.

### 'सात गावात जल संकट '



### ३० रुपये खर्चून विकत घ्यावे लागत आहे 'कोल्ड वाटर कॅन 'चे पाणी

गावात पिण्याचे पाणी मिळत नसल्याने ३० रुपये खर्चून 'कोल्ड वाटर कॅन'चे पाणी विकत घेवून काही नागरिकांवर आपली तहान भागविन्याची पाळी आली आहे. दरम्यान गोर गरीब नागरिकांना पिण्याचे पाणी मिळविण्यासाठी मात्र वणवण भटकावे लागत आहे.

### 'जलशुद्धकरण संयंत्र केंद्र बनले शोभेच्या वस्तू '

जल संकट काळात नागरिकांची तहान भागविली जावी या हेतूने लाखो रुपये खर्चून विठ्ठलवाडा गावात दोन जलशुध्दीकरण संयंत्र केंद्राचे बांधकाम करण्यात आले. मात्र दोन्ही केंद्र नेहमी बंदच राहत असल्याने शोभेच्या वस्तू बनल्या आहेत.

# रामबाग मैदान हे खेळाडूंच्या हक्काचे मैदान, जि. प. च्या इमारतीसाठी इतर जागा शोधावी

## विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची मागणी, रामबाग मैदानाची पाहणी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १२ मे :** चंद्रपूर शहरातील खेळाडू व त्यांच्या यशोगाथेचा वारसा लाभलेल्या रामबाग मैदानावर जिल्हा परिषदेची इमारत बांधकामा करिता खोदकाम करण्यात आले. याला स्थानिक नागरिक व खेळाडूंकडून प्रचंड विरोध झाला. या मैदानावर कुठलीही प्रशासकीय इमारत न उभारता ते खेळाडूंसाठी कायमस्वरूपी राखीव ठेवावे अशी आमची मागणी तसेच जनभावना असून याकरिता आमचा पूर्ण पाठिंबा आहे असे प्रतिपादन विधिमंडळ पक्षनेते तथा लोकलेखा समिती अध्यक्ष आमदार विजय वडेट्टीवार यांनी रामबाग महिन्यात मैदानाच्या पाहणी वेळी केले.



गेल्या वर्षानुवर्षापासून रामबाग मैदानाचा वापर हा विविध क्रीडा, व्यायाम तथा खेळाडूंच्या सरावा करिता होतो. मात्र गेल्या काही दिवसांपूर्वी या मैदानावर जिल्हा परिषदेची इमारत उभारण्याकरिता खोदकाम करण्यात आले. प्रचंड विरोधानंतरही मैदानाच्या मध्यभागी खोलवर खोदकाम केल्याने नागरिकांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

काल दि. ११ रोजी काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते, लोक लेखा समिती अध्यक्ष आमदार विजय वडेट्टीवार हे चंद्रपूर दौऱ्यावर असताना रामबाग मैदानावर जिल्हा परिषदेची इमारत बांधकाम करण्यात येत असून यामुळे स्थानिक नागरिक व क्रीडापटूंच्या प्रचंड भावना दुखावल्या गेल्याची वारसा त्यांना कळाली.

यावर विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी क्षणाचाही विलंब न लावता आपल्या सर्व कार्यकर्त्यांच्या ताफ्यासह रामबाग मैदानाची पाहणी केली.

व थेट जिल्हाधिकारी यांच्याशी वार्तालाप करून रामबाग मैदान हे खेळाडूंच्या हक्काचे मैदान आहे तिथे कुठलीही प्रशासकीय इमारत न उभारता प्रशासकीय इमारती करिता इतरत्र जागा शोधावी. व खेळाडू तसेच जनभावनेचा आदर राखावा असा संवाद साधला. लगेच जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक चर्चेद्वारे ती जागा खेळाडून करताच राखीव राहील यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे उत्तर दिले.

यावर प्रतिक्रिया देताना विधिमंडळ पक्ष नेते तथा लोकलेखा समिती अध्यक्ष विजय वडेट्टीवार म्हणाले की, खेळाडूंच्या या हक्काच्या मैदानावर कुठलीही प्रशासकीय इमारत उभारण्यास आमचा तीव्र विरोध असून आम्ही स्थानिक नागरिक व खेळाडूंच्या भावनांचा आदर राखून त्यांच्या या रास्त मागणीला परिपूर्णपणे पाठिंबा देत आहोत.

त्यांच्या या संघर्षात आम्ही सहभागी असून हे क्रीडा मैदान नेहमी मैदान म्हणून राहील इथे कुठलीही इमारत आम्ही होऊ देणार नाही असे स्पष्ट बजावून सांगितले.

याप्रसंगी नागरिकांनी त्यांचे आभार मानले. यावेळी मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते पदाधिकारी तथा स्थानिक नागरिक व खेळाडू प्रामुख्याने उपस्थित होते.

# रामबाग मैदानाची आमदार किशोर जोरगेवार यांच्याकडून पाहणी

## खोदलेला खड्डा बुजवण्यास सुरुवात; मैदान पूर्ववत करण्याचे काम सुरू



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १२ मे :** रामबाग मैदानावर जिल्हा परिषदेची इमारत उभारण्याच्या प्रस्तावावर काल जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर आज आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रत्यक्ष रामबाग मैदानावर जाऊन पाहणी केली. त्यांनी मैदानात खोदलेल्या भागाची तपासणी केली व संबंधित अधिकाऱ्यांना मैदान तातडीने पूर्ववत करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर मैदान पूर्ववत करण्याच्या हालचालींना गती मिळाली आहे.

पाहणीदरम्यान आमदार जोरगेवार म्हणाले, कालच्या बैठकीत प्रशासनाने जनतेच्या भावना लक्षात घेऊन सकारात्मक भूमिका घेतली. रामबाग मैदान अबाधित ठेवण्याचा निर्णय हा जनतेच्या एकजुटीचा आणि लोकशाहीच्या मूल्यांचा विजय आहे. आता इथे झालेली हानी तातडीने दुरुस्त करणे आवश्यक आहे.

रामबाग मैदानात खोदलेला खड्डा युद्धपातळीवर बुजवण्याचे काम त्वरित पूर्ण करा. मैदानाची जुनी रचना कायम राखण्यासाठी आवश्यक ती सर्व काळजी घेण्यात यावी, असेही आमदार जोरगेवार यांनी स्पष्ट केले.

आमदार जोरगेवार यांच्या पाहणीमुळे आणि कामाला मिळालेल्या गतीमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. स्थानिक रहिवासी, खेळाडू आणि ज्येष्ठ नागरिकांनी आमदारांचे आभार मानले. आमचा आवाज ऐकला गेला, हे खूप महत्त्वाचे आहे. आता मैदान पुन्हा आपल्या मुलांसाठी आणि खेळाडूंना उपलब्ध होईल, ही आनंदाची गोष्ट आहे,' असे नागरिकांनी सांगितले.

रामबाग मैदान हे चंद्रपूर शहराचे फुफ्फुस आहे. ते अबाधित राहावे, यासाठी सुरू असलेला संघर्ष आता यशाच्या दिशेने जात आहे. आमदार किशोर जोरगेवार यांच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे व नागरिकांच्या एकजुटीमुळे हे शक्य झाले आहे. मैदानाच्या दुरुस्तीची कामे लवकर पूर्ण होऊन ते पूर्ववत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या पाहणीवेळी दशरथसिंह ठाकूर, मनोज पॉल, सुभाष कासनगोट्टूवार, तुषार सोम, माजी नगरसेवक प्रदीप किरमे यांच्यासह खेळाडू आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोलोरो पिकअपची झाडाला जब्बर धडक !

## चालकाचा जागीच मृत्यू तर दोघे गंभीर जखमी

**महासागर शहर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. १२ मे :** ब्रम्हपुरी तालुक्यातील गांगलवाडी मुडझा मुख्य रस्त्यावर डोर्ली बसस्थानकाच्या समोर बोलोरो पिकअपची कडूनिंबाच्या झाडाला जबर धडक दिल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. यश चंदन बावणे वय वर्षे १९ असे मृतक वाहण चालकाचे नाव आहे तर, निकेश प्रधान वय २१, शेंडे असे जखमीचे नाव आहे.



सविस्तर वृत्त असे आहे की, खेडोपाडी असलेल्या किराणा दुकानमध्ये किराणा सामान घेवून बोलोरो पीकअपने गांगलवाडी मुडझा मुख्य मार्गे जात असतांना वाहन चालक यश चंदन बावणेचे नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला असलेल्या कडूनिंबाच्या झाडावर धडक दिली. त्यामध्ये यशचा जागीच मृत्यू झाला तर त्याच्याच बाजूला कॅबिनमध्ये बसणारे निकेश आणि शेंडे हे गंभीररित्या जखमी झाले. जखमीना सर्वोदय रूग्णालय ब्रम्हपुरी मध्ये उपचाराकरिता हलविण्यात आले.

# परिचारिका म्हणजे रुग्णालयाचा श्वास : आ. किशोर जोरगेवार

## जागतिक परिचारिका दिन साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १२ मे :** समाजात डॉक्टरांना देव मानले जाते आणि या देवाच्या सेवेला साथ देणाऱ्या परिचारिका म्हणजे त्यांची खरी शक्ती आहे. परिचारिका हा केवळ एक व्यवसाय नसून ती एक सेवा वृत्तीची मूर्ती आहे. परिचारिका म्हणजे रुग्णालयाचा श्वास आहे. त्यामुळे जागतिक परिचारिका दिन हा दिवस केवळ एक औपचारिकता नसून, त्याग, सेवा, सहवेदना आणि माणुसकीच्या सर्वोच्च मूल्यांचा गौरव करणारा दिवस आहे, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.



कर्मवीर मा.सा. कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या वतीने प्रियदर्शिनी सांस्कृतिक सभागृहात जागतिक परिचारिका दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, डॉ. दीक्षित, प्रा. पुष्पा पोडे, वर्षा टेंभुर्णे, माया आश्राम आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार जोरगेवार म्हणाले की, पेशंटच्या वेदनेत सहभागी होणाऱ्या, रात्रंदिवस अविरत सेवा देणाऱ्या, स्वतःच्या कुटुंबापेक्षा रुग्णांच्या सेवेला प्राधान्य देणाऱ्या परिचारिकांचे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. कोरोना महामारीच्या काळात आपण सगळ्यांनी परिचारिकांची खरी ताकद अनुभवली. जोखीम असूनही त्या डगमगल्या नाहीत, त्यांनी रुग्णांसोबत मानवतेचा खरा धर्म निभावला. त्या काळात परिचारिका म्हणजे देवदूतच होत्या.

आजच्या या विशेष दिवशी, एका लोकप्रतिनिधीच्या नात्याने, परिचारिकांच्या सेवा-सुविधा, सन्मान व हक्क यांचा विचार करताना शासनाच्या पातळीवर मी नेहमीच तुमच्या पाठीशी उभा राहीन. आपल्या चंद्रपूर जिल्ह्यातील वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असेही त्यांनी सांगितले.

रुग्णांच्या वेदनेने सुरू झालेला परिचारिकांचा दिवस, रुग्णाच्या चेहऱ्यावरच्या समाधानानेच संपायला हवा. काल 'मदर्स डे' साजरा झाला, आज आपण परिचारिका दिन साजरा करत आहोत. परिचारिका ही आईसारखीच शांत, संयमी आणि काळजीवाहू असते. आई आपल्या लेकरासाठी जे करते, तेच एक परिचारिका आपल्या रुग्णासाठी करते. त्यामुळे परिचारिकांचा सन्मान हा समाजाचा महोत्सव असावा, असेही आमदार जोरगेवार म्हणाले. या कार्यक्रमाला परिचारिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# भगवान बुद्धांची शिकवण व विचार हा शांतिमय जीवन जगण्याचा मार्ग : जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह

## बुद्ध पौर्णिमेच्या मंगलमय पर्वावर ओमॅट वेस्ट लिमिटेडच्या वतीने येरुर येथे नवनिर्मित बुद्ध विहार लोकार्पण सोहळा संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १२ मे :** भगवान बुद्धांची शिकवण व विचार हा शांतिमय जीवन जगण्याचा मार्ग आहे. भगवान बुद्धांच संपूर्ण जीवन प्रवास हा प्रत्येकांना प्रेरणा देणारा असून त्याचा खऱ्या अर्थाने अवलंब केल्यास प्रगतीची शिखरे गाठण्यास नक्कीच यश मिळतो असे प्रतिपादन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी केले.

येरुर येथे बुद्ध पौर्णिमेच्या मंगलमय पर्वावर ओमॅट वेस्ट लिमिटेड (श्री सिद्धबली इस्पात लिमिटेड) यांच्या वतीने नवनिर्मित बुद्ध विहार लोकार्पण प्रसंगी व्यक्त केले.

उदघाटक व अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, प्रमुख अतिथी म्हणून ओमॅट वेस्ट लिमिटेड चे प्लांट हेड अविनाश डोंगरे, मुख्य कार्यकारी अधिकारी रिषभ मित्तल, येरूरच्या सरपंचा प्रियंका मडावी, उपसरपंचा सुनीता वडस्कर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. ओमॅट वेस्ट लिमिटेड च्या वतीने गावांत बुद्ध विहाराची निर्मिती करून वर्तमान व भावी पिढीसमोर भगवान बुद्धांच्या विचारास एकरूप होण्याची संधी निर्माण करून दिली आहे. आज भारत व पाकिस्तान या देशांत युद्धाची परिस्थिती निर्माण झाल्याचे चित्र निर्माण झाले असतांना भगवान बुद्धांचा शांतीचा संदेश याठिकाणी व्यापक पद्धतीने काम करू शकतो. भगवान बुद्धांनी आपल्या जीवनात अनेक त्याग करून आपल्या विचारांनी अनेकांचे आयुष्य घडवले आहे असेही मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी आपल्या संबोधनातून सांगितले.



ओमॅट वेस्ट लिमिटेड च्या विविध उपक्रमांची माहिती देत येत्या काळात अनेक सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून गरजू व्यक्ती तसेच गावात सोयी सुविधा व विकासात्मक दृष्टिकोनातून काम करणार असल्याचे मनोगत आपल्या प्रास्ताविकावून प्लांट हेड अविनाश डोंगरे यांनी सांगितले. भूतकाळात व वर्तमानात उदार भावनेतून सदैव सकारात्मक सहकार्य ओमॅट वेस्ट लिमिटेड च्या माध्यमातून गांवात होत असतांना भविष्यातही हि साखळी कायम स्वरूपी राहील हि अपेक्षा आपल्या संबोधनातून सरपंच प्रियांका मडावी यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे संचालन कपिल शेंडे यांनी तर आभार प्रदर्शन रवि चावरे यांनी केले.

ओमॅट वेस्ट लिमिटेडचे महाप्रबंधक रवी चावरे यांच्या पुढाकारातून संपन्न या कार्यक्रमाच्या यशस्वीततेकरिता महाप्रबंधक मनीष वडस्कर, महाप्रबंधक अमरेंद्र सिंह ठाकूर, महाप्रबंधक सतीश मूलकलवार, महाप्रबंधक ओमनरेश भदोरिया, मानव संसाधन विभाग प्रमुख अभय सिंह, प्रशासन विभाग प्रमुख दीपक पराळे, बांधकाम विभाग प्रमुख चेतन चोहिवाल, विजय कनोजे, आनंद मिश्रा, कपिल जैन, अभिषेक खुपत, शुभम तंबोली, स्वप्नील देशमुख, खुशाल गावंडे, समीर पाल, अशोक टोंगे यांनी विशेष योगदान दिले.

# पाटण येथे आमदार भोंगळे यांच्या हस्ते मुलींच्या वसतिगृहाचे लोकार्पण

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. १२ मे :** तालुक्यातील मौजा पाटण येथील शासकीय आदिवासी माध्यमिक आश्रमशाळा पाटण येथे नव्याने बांधण्यात आलेल्या मुलींच्या वसतिगृहाचे लोकार्पण आमदार देवराव भोंगळे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी पाटन येथे गोंडी आर्टच्या प्रदर्शनीची देखील पाहणी करण्यात आली. सुरु असलेल्या उन्हाळी शिबीर-२०२५ च्या समारोपीय कार्यक्रमास उपस्थितांशी संवाद साधला याठिकाणी विद्यार्थिनींनी आपल्या क्रिडा व कलात्मक कौशल्यांचे प्रदर्शन केले.

पाटण येथिल मुलींच्या वस्तीगृहातून एक आदर्श विद्यार्थी घडून बाहेर निघेल. यां वस्तीगृहाचा फायदा सर्वासामान्य कुटुंबातील मुलींना व्हायला पाहिजे यामाध्यमातून त्यांना चांगले शिक्षण घेता येईल. सरकार मुलींच्या शिक्षणासाठी सर्वोतोपरी मदत करीत असून मुलींनी उच्च शिक्षण घेत सर्वात उच्च पदावर विराजमान होत तालुक्यासह जिल्ह्याचे नाव लौकिक केले पाहिजे. यासाठी संबंधित विभागाने लक्ष देऊन सहकार्य मुलींना सहकार्य करण्यासबंधी सूचना दिल्या.

यावेळी प्रकल्प अधिकारी विकास राचलवार, जिवतीचे मुख्याधिकारी येमाजी धुमाळ, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष महेश देवकते, माजी पं.स. सभापती अंजना पवार, भिमराव पवार, जितेश कुळमेथे, सरपंचा नयना शिंदे, प्रेमदास राठोड, तुकाराम वारलवाड, प्रल्हाद मदने, आसिफ सय्यद, राहुल राठोड, राजेश घोटकर, मुख्याध्यापक वासुदेव राजपुरोहित, दिगांबर आंबटवाड, चंद्रकांत घोडके, खमनराव तोडासे, नामदेव जाधव, संदिप शिंदे, बालाजी बिराजदार, संदीप शिंदे, हितेश जाधव, नारायण कांबळे, संभाजी शिंदे, संग्राम बाजगीर आदिंसह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)



# ‘ॲपल’चा ‘व्हॉट्सॲप’मध्ये मेसेज ट्रान्सक्रिप्शन फीचर

**टेक टॉक**

‘व्हॉट्स ॲप’ने नोव्हेंबर २०२४ मध्ये व्हॉईस मेसेज ट्रान्सक्रिप्शन हे फीचर सादर केलं होतं. आता कंपनी या फीचरमध्ये काही महत्त्वाचे बदल करण्याची तयारी करत आहे. त्यात ग्राहकांना अधिक कंट्रोल्स दिली जातील. या नवीन अपडेटची सध्या ‘आयफोन’वर चाचणी केली जात आहे. एका अहवालानुसार, ‘व्हॉट्सॲप’ आयफोनच्या ग्राहकांसाठी नवीन कंट्रोल्सवर काम करत आहे. याद्वारे त्यांना कधी आणि कोणते व्हॉइस संदेश ट्रान्सक्रिप्ट करायचे आहे हे ठरवता येईल. आत्तापर्यंत हे फीचर सुरू केल्यावर प्रत्येक व्हॉईस संदेशाचे ट्रान्सक्रिप्शन केले जात होते; परंतु नवीन अपडेटनंतर, ग्राहकांना हवं तर प्रत्येक व्हॉइस मेसेजचे ट्रान्सक्रिप्शन आपोआप मिळू शकेल किंवा कोणत्या मेसेजला ट्रान्सक्रिप्शन आवश्यक आहे, ते मॅन्युअली निवडण्याचा पर्याय असेल. ग्राहकाने मॅन्युअल मोड निवडल्यावर त्याला व्हॉइस मेसेज बबलमध्ये एक नवीन बटण दिसेल. या बटणावर टॅप करून तो त्या विशिष्ट व्हॉइस मेसेजचे ट्रान्सक्रिप्शन मिळवू शकेल.

# जोश

# पंखात झेपावण्याचे बळ!

**अचिव्हर**

गावात रेशनचं छोटंसं दुकान चालवणाऱ्या वडिलांसाठी कुटुंबाचा उदरनिर्वाह करणं हीच मोठी गोष्ट असतं. अशा परिस्थितीत आपल्या मुलीला पायलट बनवण्याचं स्वप्न पाहणं फारच दूरचं. मोती उल हक यांची मुलगी तैयबाने त्यांना ‘मला पायलट बनून आकाशात उडायचे आहे’, असं सांगितलं. आपल्या मुलीची जिद्द पाहून त्यांनी तिला पायलट बनवण्याचा निर्णय घेतला. मात्र, या दोघांनाही आपल्या संसारापेक्षा मोठं स्वप्न पाहण्यासाठी सामाजिक कुरबुरी, आर्थिक संघर्ष आणि इतर अनेक आव्हानांना तोंड द्यावं लागलं, तरी तैयबाने जिद्द, अढळ विश्वास आणि मेहनतीने प्रत्येक अडथळ्यावर मात केली.





**छोट्याशा गावात वाढलेल्या तैयबा**

अफरोजचा गावच्या वाटेपासून हजारो फूट आकाशात उडण्यापर्यंतचा प्रवास एखाद्या चित्रपटात शोभण्यासारखा आहे. आज ती केवळ कॉकपिटमध्ये बसून विमान उडवत नाही, तर संपूर्ण पिढीला कोणतंही स्वप्न पूर्ण करता येतं, असा विश्वास ठेवण्यास प्रेरित करते.

**लहान गाव, मोठी स्वप्ने**

तैयबा बिहारमधील सारणमधील जलालपूर या छोट्याशा गावातील निम्न मध्यमवर्गीय कुटुंबातील आहे. वडील रेशनचं छोटं दुकान चालवतात आणि आई सॅमसन निशा गृहिणी आहे. दुकानातून संपूर्ण कुटुंबाचा खर्च भागवणं कठीण झालं होतं. कोरोनाकाळात त्यांचं दुकान बंद झालं तेव्हा आव्हानं आणखी वाढली; मात्र वडिलांनी मुलांना चांगलं शिक्षण देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. तैयबा थोडी मोठी झाल्यावर वडिलांनी गावातल्या शाळेत दाखल केलं. बारावीचं शिक्षण पूर्ण केल्यानंतर तिने वडिलांकडे पायलट होण्याची इच्छा व्यक्त केली.

ती अभ्यासात नेहमीच अव्वल असायची. त्यामुळे वडिलांनीही होकार दिला; पण खरी अडचण होती, फीच्या पैशाची. आपल्या मुलीच्या स्वप्नांना पंख देण्यासाठी आईने आपली शेतजमीन विकली. तैयबाचा भुवनेश्वरमधील सरकारी विमान प्रशिक्षण संस्थेत जाण्याचा पहिला अडथळा पार केला; पण अडचणी संपण्याची चिन्हं दिसत नव्हती. पित्ताशयातील खड्यांमुळे तिला वैद्यकीयदृष्ट्या अनफिट घोषित करण्यात आलं.

तिने पायलट होण्याचं प्रशिक्षण नुकतंच सुरू केलं होतं. शस्त्रक्रिया झाल्यानंतर ती पुन्हा प्रशिक्षण घेण्यासाठी भुवनेश्वरला गेली; पण इथेही तिला अनेक समस्यांना सामोरं जावं लागलं. तिने सुमारे ८० तासांचा उड्डाणाचा अनुभव घेतला, तेव्हा प्रशिक्षक वैमानिकाचा मृत्यू झाला. तिच्या मनावर या घटनेचा खूप आघात झाला. तिला तिचं प्रशिक्षण सोडून द्यावं लागलं; परंतु घरच्यांच्या पाठिंब्यामुळे ती त्यावर मात करू शकली. तैयबाने ‘इंदूर फ्लाइंग क्लब’मध्ये प्रवेश घेतला आणि प्रशिक्षण सुरू केलं. आधीच ऐंशी तासांचं प्रशिक्षण पूर्ण केलं असल्याने, तिने उर्वरित १२० तासांचं प्रशिक्षण पूर्ण केलं आणि पायलटचा परवाना मिळवला. परवाना मिळाल्यानंतर तिने सारण जिल्ह्यातील दुसरी महिला पायलट आणि जलालपूरची पहिली महिला पायलट बनण्याचा मान मिळवला.

**सामाजिक विरोधाचा सामना**

पायलट होऊनही तिचा संघर्ष संपला नाही. एकीकडे लोक तिच्या यशाचा आनंद साजरा करत असताना दुसरीकडे काही कट्टरपंथी लोक मुस्लिम धर्मातील महिलांनी असे कपडे घालणं हराम असल्याचं सांगत होते. तैयबाने पायलटचा ड्रेस घालू नये, असं त्यांचं म्हणणं होतं. त्यावर तैयबाने कट्टरवाद्यांना सडेतोड प्रत्युत्तर दिलं आणि सांगितलं की, मुलींची ओळख कपड्यांवरून बनवण्याऐवजी आपल्या बुद्धिमत्तेने ओळख बनवली पाहिजे.

कुटुंबाचा पाठिंबा आणि योग्य दिशेने केलेले प्रयत्न यामुळे जीवनातील कोणतंही ध्येय गाठता येतं. यश हे कोणत्याही ठिकाणावर किंवा परिस्थितीवर अवलंबून नसतं. अपयश ही यशाची पहिली पायरी मानली जाते. आव्हानांशी लढतात, तेच आपले ध्येय साध्य करतात. अशी कोणतीही समस्या नाही जी प्रयत्नाने सोडवली जाऊ शकत नाही, हा धडा तिने घालून दिला.

## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

## व्हॉट्स न्यू?

**स्मार्टवॉच टिपणार हातांच्या हालचाली**




स्मार्टवॉच आता जास्त स्मार्ट होणार आहे. हे वॉच युजरच्या हातांच्या हालचाली टिपून त्याच्या कामांची माहिती घेईल. यामुळे स्मार्टवॉचला कनेक्ट असणारी हेल्थ ॲप्स युजरच्या आरोग्याचं अधिक चांगल्या प्रकारे विश्लेषण करू शकतील. ‘कार्नेगी मेलन’ विद्यापीठात याबाबतचं संशोधन करण्यात आलं. यात ५० जणांवर हा प्रयोग करण्यात आला. त्यांना नवं तंत्रज्ञान वापरून तयार करण्यात आलेलं स्मार्टवॉच घालण्यात आलं. हातांच्या हालचाली टिपून त्यांच्या दिनचर्येबाबत माहिती घेण्यात आली. हे तंत्रज्ञान भविष्यात उपयुक्त ठरू शकेल.

## स्मार्ट टिप्स

**असा शोधा फोन**

आपला सायलेंट मोडवरचा मोबाइल सापडत नसेल तर या टिप्स फॉलो करा.



‘अँड्रॉइड डिव्हाइस मॅनेजर’ तुमच्या कामी येईल.यासाठी दुसऱ्या मोबाइल फोनवर इंटरनेट ब्राउजर ओपन करा. ‘फाइंड माफ फोन थ्रू अँड्रॉइड डिव्हाइस मॅनेजर’ टाईप करा. आता तुम्हाला तुमच्या जी मेल खात्यात साईन इन करावं लागेल. फोनमधल्या आयडीचा वापर करा. काही सूचना असतील तर ओके म्हणा. इथे ‘रिंग’, ‘लॉक’ आणि ‘इरेज’ हे ऑप्शन्स दिसतील. त्यातल्या ‘रिंग’वर क्लिक करा. आता फोन वाजवून बघा. फोनची रिंग वाजेल.

## ॲप वर्ल्ड

**कामाचे फीचर्स**



व्हॉट्स ॲपमध्ये लवकरच काही नवी फीचर्स जोडली जाणार आहेत. त्यापैकी एक म्हणजे ‘स्टीकर नोटिफिकेशन प्रीव्ह्यू’. हे फीचर युजर्सना स्टीकरसोबतच व्हॉट्स ॲप मेसेज प्रीव्ह्यू करण्याची सोय उपलब्ध करून देईल. बिझनेस ॲप वापरणाऱ्यांसाठी ‘प्रोडक्ट कॅटलॉग’ हे फीचर असेल. छोट्या व्यावसायिकांना त्याचा उपयोग होईल.

## गेमिंग

**वेड ‘पब्जी’चं**

‘पब्जी’ या मोबाइल गेमने तरुणाईला अक्षरश: वेड लावलं. मित्रांनो, भारतीय क्रिकेटपटूही पब्जी गेमचे चाहते आहेत. बसमधून प्रवास करताना, फावल्या वेळात ते पब्जी गेम खेळत असतात.



महेंद्रसिंह धोनी, मनिष पांडे, युजवेंद्र चहल आणि केदार जाधव पब्जीचे मास्टर्स आहेत. फिरकी गोलंदाज कुलदीप यादवनेच याचा खुलासा केला होता. पब्जी लवकरच अपडेट होणार आहे. सध्याचा हंगाम संपल्यानंतर नव्या रुपातलं पब्जी तुम्ही खेळू शकता. पब्जीने क्रिकेटपटूंनाही झपाटून टाकल्याचं दिसतंय.

# स्वित्झर्लंडसारखी भारतातील ठिकाणे

**भटकंती**

भारत निसर्गसौंदर्यासाठी जगभर प्रसिद्ध आहे. इथे अनेक सुंदर ठिकाणे आहेत. ती पाहण्यासाठी लोक लांबून येतात. प्रवासासाठी उन्हाळी सुटी हा सर्वोत्तम काळ आहे आणि प्रवासाचा विचार येतो, तेव्हा लोक प्रथम परदेशात जाण्याचा विचार करतात; मात्र अनेक कारणांमुळे परदेशात जाण्याची योजना अपूर्ण राहते. अशा परिस्थितीत भारतात परदेशासारखी ठिकाणे पाहायची संधी मिळाली तर? होय, हे अगदी शक्य आहे. कारण आपल्या देशातही अशी अनेक ठिकाणे आहेत, जी परदेशातील नयनरम्य पर्यटनस्थळांसारखी वाटतील. भारतातील अशा ठिकाणी गल्यास तुम्हाला स्वित्झर्लंडमध्ये असल्यासारखे वाटेल. या ठिकाणांना भारताचे स्वित्झर्लंड असेही म्हटले जाते.

**औली**

उत्तराखंड राज्यातील औली हे देशातील सुंदर हिल स्टेशनपैकी एक आहे. त्याला भारताचे स्वित्झर्लंड असेही म्हटले जाते. हे चमोली जिल्ह्यात आहे. तिथे तुम्ही परदेश प्रवासाचा आनंद घेऊ शकता. आपल्या सौंदर्यासोबतच हे हिल स्टेशन स्कीइंगसाठी पर्यटकांची पहिली पसंती आहे.

**खज्जियार**

हिमाचल प्रदेशात असलेल्या या शहराला भारताचे मिनी स्वित्झर्लंड म्हणतात. रोजच्या गजबजाट, गर्दी आणि कोलाहलापासून दूर काही शांततापूर्ण क्षण घालवायचे असतील तर हे योग्य ठिकाण आहे. येथील नैसर्गिक सौंदर्य आणि शांतता मन मोहून टाकेल.

**नौकुचियाताल**

उत्तराखंडमधील नौकुचियाताल हे देखील एक असे ठिकाण आहे, जिथे गेल्यावर परदेशात प्रवास केल्यासारखे वाटते. नैनितालजवळील हे सुंदर हिल स्टेशन भीमतालपासून फक्त पाच किलोमीर अंतरावर घनदाट जंगलांनी बहरलेले एक ठिकाण आहे, जिथे नैनितालचा सर्वात खोल तलाव आहे.

**मॅक्लोडगंज**

शिमला-मनालीसारख्या गर्दीच्या ठिकाणी जायचे नसेल तर मॅक्लोडगंज हे एक चांगले ठिकाण आहे. हे हिल स्टेशन त्याच्या सौंदर्य आणि शांततेसाठी प्रसिद्ध आहे. हिमाचल प्रदेशातील कांगडा जिल्ह्यात वसलेले हे शहर तिबेटी लोकांचे घर आहे.

**मुन्सियारी**

मुन्सियारीला उत्तराखंडचा आत्मा म्हटले जाते. याला ’मिनी स्वित्झर्लंड’ असेही म्हणतात. हिमालयाच्या पायथ्याशी वसलेले हे एक छोटेसे गाव आहे. इथून तुम्हाला घनदाट जंगले आणि आजूबाजूला बर्फाच्छादित शिखरांचे सुंदर दृश्य दिसते.






# ‘किंग ए आय’ने ‘एआय’ला टाकले मागे


**अपडेट**

‘किंग एआय’ हे उत्तम आणि अविश्वसनीय फोटो आणि व्हिडिओ तयार करू शकणारं एआय टूल आहे. ‘किंग एआय’ २.० मध्ये मोशन क्वालिटी, व्हिज्युअल एस्थेटिक्स आणि सिनेमॅटिक रिस्पॉन्सिव्हनेस यासारखी फीचर्स आहेत. कंपनीच्या म्हणण्यानुसार याचा वापर करून तयार केलेल्या व्हिडीओमधले मानवी भाव अतिशय नैसर्गिक आहेत. ‘किंग ए आय २’ लॉँच करण्यापूर्वी त्याची अनेक आंतरराष्ट्रीय मानकांनुसार चाचणी करण्यात आली. त्यात त्याने इमेज-टू-व्हिडिओ जनरेशनमध्ये जागतिक ‘एआय’ टूल्सना मागे टाकलं आहे. याचे परस्परसंवादी ‘एआय’ अनुभव ‘एआय’ मल्टी-मॉडेल व्हिज्युअल लँग्वेज (एमव्हीएल) ला सपोर्ट करतात. त्यामुळे याचा वापर करून परस्परसंवादी आणि नियंत्रण करण्यायोग्य व्हिडीओ तयार करता येतात. त्याच्या स्टँडर्ड आणि मास्टर अशा दोन आवृत्त्या लाँच करण्यात आल्या आहेत. मास्टर आवृत्ती प्रगत एडिटिंग टूल्स आणि उत्तम आउटपुट गुणवत्ता देते. हे ‘एआय’ केवळ सर्जनशील उद्योगासाठीच ‘गेम चेंजर’ ठरेल असं नाही, तर त्यामुळे भविष्यात हॉलीवूड आणि मीडिया निर्मितीचा मार्गदेखील बदलू शकतो.

# जुने ब्लॅक अँड व्हाईट फोटो करा रंगीत!

**रंजक**

मित्रांनो, आपल्या जुन्या आठवणी पुन्हा जागवण्याचा मार्ग म्हणजे जुने फोटो पाहणं. पण बरेचदा ते कृष्णधवल असतात. ते रंगीत करता आले तर काय मजा येईल, असं मात्र वाटून जातं. आता यासाठी तुम्ही चॅटजीपीटीचा वापर करू शकता. कृष्णधवल फोटो रंगीत करण्यासाठी ‘चॅटजीपीटी’चा वापर करण्याची पद्धत खूप सोपी आहे. तुमच्याकडील जुने कृष्णधवल फोटो रंगीत करायचे असतील तर ‘चॅटजीपीटी’ च्या मदतीने रंगीत करता येतात. हा नवीन ट्रेंड मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. लोक आपले जुने कौटुंबिक फोटो रंगीत करून घेत आहेत. यासाठी सर्वप्रथम ‘चॅटजीपीटी’ वेबसाइट किंवा मोबाइल ॲपवर जा. ‘चॅटजीपीटी’ची इमेज अपलोडिंगला सपोर्ट करणारी आवृत्ती वापरत असल्याची खात्री करा. आता तुम्हाला रंगीत करायचा असलेला कृष्णधवल फोटो अपलोड करा. ’चॅटजीपीटी’ला हा ब्लॅक अँड व्हाईट फोटो वास्तविक रंगीत फोटोसारख्या दिसणाऱ्या नैसर्गिक रंगीत व्हर्जनमध्ये रूपांतरित करा’, अशी सूचना द्या. तुमचा नव्याने रंगीत झालेला फोटो समोर तयार होईल..



# टॉपर व्हायचेय, मग या टिप्स फॉलो करा

**स्टडी टिप्स**

प्रत्येक विद्यार्थ्याला आयुष्यात यश मिळवायचे असते. त्याची अभ्यासाची स्वतःची पद्धत असते. टॉपर विद्यार्थी अभ्यासासाठी काही खास टिप्स फॉलो करतात. त्यामुळे ते अभ्यासात यश मिळवतात. चला पाहूया अशा कोणत्या खुबी वापरल्या जातात...


विद्यार्थ्यांसाठी टिप्स

१. वेळापत्रक तयार कराः वेळापत्रकानुसार अभ्यास करून विद्यार्थी वेळेवर अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात आणि अभ्यासात सुधारणाही करू शकतात. त्यामुळे त्यांना परीक्षेत चांगले गुण मिळतात.

२. पुनरावृत्ती (सराव)ः अभ्यासक्रमाची दोन-तीन वेळा उजळणी करून विद्यार्थी यश मिळवू शकतात. उजळणी करून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी गोष्टी सहज लक्षात ठेवता येतात.

३. नोट्स बनवाः यशस्वी विद्यार्थी उजळणी करताना स्वतःच्या नोट्स काढतात. प्रत्येक वेळी ते उजळणी करून त्या विषयाच्या नोट्स आणखी सोप्या करतात. याच्या मदतीने विद्यार्थी परीक्षेपूर्वी नोट्समधून झटपट उजळणी करू शकतात.

४. माईंड मॅप बनवाः अनेकांचा असा विश्वास असतो की माईंड मॅपद्वारे गोष्टी सहज लक्षात ठेवल्या जाऊ शकतात. माईंड मॅप्सच्या मदतीने तथ्ये, तारखा आणि क्रम सहज लक्षात ठेवता येतो.



५. अवघड विषय आधी वाचाः काही लोक कठीण विषयाचा अभ्यास सर्वात शेवटी करायचं ठरवतात. त्यामुळे ते विषय शेवटपर्यंत वाचता येत नाहीत. यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम कठीण विषयांचा अभ्यास केला पाहिजे. नंतर ते सोप्या विषयांचा अभ्यास करू शकतात.

६. दुसऱ्याला शिकवाः तुम्ही शिकलेलं दुसऱ्याला शिकवलं तर तो विषय तुमच्या चांगला लक्षात राहील. आपला मेंदू पूर्वी शिकलेल्या सुमारे ९० टक्के गोष्टी दीर्घ काळासाठी लक्षात ठेवू शकतो.

७. स्वतःसाठी अभ्यासाची उद्दिष्टे निश्चित कराः विद्यार्थ्यांनी स्वतःसाठी छोटी उद्दिष्टे ठेवली, तर ती साध्य केल्यावर ते यशस्वी होतील. ते त्यांना आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा देईल.

८. अभ्यासासाठी एक वेळ ठरवाः यशस्वी होण्यासाठी तुम्हाला कधी अभ्यास करायचा आहे आणि दिवसात कधी ब्रेक घ्यायचा आहे हे ठरवा. अभ्यासासाठी वेळ निश्चित करा. त्यामुळे अभ्यासावर लक्ष केंद्रित करता येते

९. टेस्ट सिरिजः यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षेपूर्वी मॉक टेस्ट सिरीज सोडवावी: जेणेकरून ते परीक्षेपूर्वी आपल्या तयारीची चाचणी घेऊ शकतील आणि त्रुटी आणि चुका सुधारू शकतील.

१०. योग्य साहित्य निवडाः विद्यार्थी रात्रंदिवस मेहनत करून अभ्यास करतात; पण परीक्षेप्रसंगी त्यांना काही आठवत नाही. अभ्यासक्रमात दिलेली पुस्तके आणि तज्ज्ञांनी किंवा शिक्षकांनी सुचविलेल्या पुस्तकांमधूनच तयारी करा. योग्य अभ्यास साहित्य तुमच्या यशासाठी खूप उपयुक्त ठरेल.

# विदर्भात वादळी वाऱ्यांसह पावसाचा इशारा





■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
भारतीय हवामान विभागाने विदर्भ क्षेत्रात पुढील २४ तासांसाठी वादळी वाऱ्यांसह पावसाचा इशारा दिला आहे. या हवामान बदलामुळे शेती, वाहतूक आणि जनजीवनावर परिणाम होण्याची शक्यता आहे.
दुसरीकडे, बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडा आणि इतर काही भागांना इशारा दिला असून, बीड आणि परिसरात झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. बीड जिल्ह्यात आज पावसामुळे बीड-नगर रोडवरील पेट्रोल पंपाचे नुकसान झाले आहे.
दरम्यान हवामान विभागाने या भागाला सतर्कतेचा इशारा देखील दिला आहे. बीड, परभणी, लातूर, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, धाराशिव आणि जालना या जिल्ह्यांमध्ये वीजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस आणि ४० किमी/तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.
विदर्भातील यवतमाळ, वाशिम, अकोला, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली येथेही अशीच हवामान परिस्थिती राहण्याचा अंदाज आहे. विदर्भात नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## अवकाळीचा तडाखा : वीज कोसळून महिला ठार

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १२ :
मागील १ तारखेपासून जिल्ह्यात अधूनमधून धुमाकूळ घालणाऱ्या अवकाळी पावसाने आज सोमवारी (१२ मे) बुलढाणा जिल्ह्यात ठिकठिकाणी जोरदार हजेरी लावली.
लोणार तालुक्यातील बिबी परिसरात झालेल्या वादळी पावसादरम्यान वीज अंगावर पडून एक शेतकरी महिला ठार झाली तर सहा शेतमजूर महिला जखमी झाल्यात. दुसरीकडे वादळी पावसामुळे पिकांचे आणि आंब्यांचे नुकसान झाले आहे. बुलढाणा जिल्ह्याच्या घाटावरील काही तालुक्यात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावली.
बुलढाणा शहरात पावसाने जोरदार वाऱ्यांसह पंचवीस मिनिटे हजेरी लावली. चिखली शहर व परिसरात हजेरी लावली. लागूनच असलेल्या सिंदखेड राजा तालुक्यातील साखरखेर्डा गाव आणि परिसरातील अनेक गावात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने कमी अधिक एक तास हजेरी लावली.
लोणार तालुक्यातही अवकाळी पावसाने हजेरी लावली. लोणार शहरात सौम्य स्वरूपाचा पाऊस होता. मात्र ग्रामीण भागातील बीबी, चोर पांग्रा सारख्या अनेक गावात पावसाचा जोर जास्त होता. चोर पांग्रा येथे दोन वाजताच्या सुमारास दमदार पावसाला सुरुवात होवून पावसाने जोर धरला.
वीरपांग्रा येथील गट क्रमांक ९२ मधील देविदास चतरू चव्हाण यांच्या शेतात कापसाची वेचणी सुरु होती. त्यांच्या सून रंजना संदीप चव्हाण (वय ३५) यांच्यासह एकूण सात महिला वेचणी करीत होत्या. यावेळी त्यांच्यावर वीजेचा लोळ अंगावर कोसळून रंजना चव्हाण या जागीच दगावल्या. सोबतच्या सहा महिला अंतरावर असल्याने बचावल्या.

## दुचाकीस्वार हवेत उडाला

### एसटी बसची धडक : जागीच मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १२ :
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसने भरधाव वेगात दिलेल्या धडकेत दुचाकीस्वारी युवक ठार झाला. बसची धडक इतकी जोराची होती की, दुचाकी स्वार अक्षरशः हवेत भिरकावला गेल्याने रस्त्यावर आदळून जागीच गतप्राण झाला. सोमवारी, १२ मे रोजी दुपारी हा अपघात घडला.
चिखली-खामगाव मार्गावरील सोमठाणा फाट्यावर ही दुर्घटना घडली. शंकर भोपळे (४०),रा. तेल्हारा, ता. चिखली असे मृतकाचे नाव आहे. शंकर भोपळे दुचाकीवरून चिखली येथून आपल्या मूळ गावी तेल्हारा कडे जात होते. सोमठाणा फाट्याजवळ मागून आलेल्या एसटी बसने दुचाकीला जोरदार धडक दिली. त्यांचा जागीच मृत्यू झाला.
दरम्यान चिखली तालुक्यात सलग दुसऱ्या दिवशी अपघाताची नोंद झाली. रविवारी, संध्याकाळी उशिरा एका ॲपेचालकाने आपले वाहन निष्काळजीपणे चालवून डिव्हायडरला धडक दिली. त्यात ॲपेचे एक्सल तुटून झालेल्या अपघातात प्रवासी जागीच ठार झाला होता. संजय दिलीप गायकवाड (वय ३०), रा. नायगाव खुर्द, तालुका चिखली, असे आरोपी चालकाचे नाव आहे. ॲपेतील प्रवासी प्रकाश बबन झोपाटे (वय, ३०), रा. शेलगाव देशमुख, ता. मेहकर, यांचा जबर मार लागल्याने जागीच मृत्यु झाला.

## दोन तरुणांचा बळी

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १२ :
नागपूर-यवतमाळ-तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ निर्माण करताना यवतमाळ शहराबाहेरचा रस्ता सदोष पद्धतीने तयार केला. महामार्ग प्राधिकरणाने केलेली ही घोडचूक आता शहराबाहेर दोन उड्डाणपूल बांधून सुधारण्यात येत आहे. मात्र हे काम करताना सुरक्षिततेच्या कोणत्याही उपाययोजना करण्यात न आल्याने या ठिकाणी दररोज अपघात होत आहेत.
आर्णी मार्गावर वनवासी मारोती चौकात उड्डाणपुलाचे काम सुरू असलेल्या ठिकाणी दुचाकी सदोष दुभाजकाला धडकल्याने झालेल्या अपघातात दोन तरुण जागीच ठार झाले. प्रेम संतोष बावणे (१९) रा. शिवाजी नगर लोहारा, रोहित सुरेंद्र आमटे (१९) अशी त्यांची नावे आहेत.
हे दोघे दुचाकीने यवतमाळकडे येत होते. या मार्गावर उड्डाणपुलाचे काम आणि बाजूने रेल्वे बोगद्याचे काम सुरू आहे. येथील तात्पुरते दुभाजक चुकीच्या पद्धतीने ठेवले आहे. त्यावर पुरेसे रिफ्लेक्टर बसविलेले नाही. त्यामुळे हे दुभाजक वाहन चालकाना जवळ येईपर्यंत दिसत नाही. यामुळे येथे सातत्याने अपघात होतात. मात्र अपघातात दोन तरुणांचा बळी गेल्याने रस्ता बांधकाम करणाऱ्या कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी मृतांच्या नातेवाईकांनी केली आहे.
राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने नागपूर-यवतमाळ-तुळजापूर राष्ट्रीय मार्ग तयार करताना कळंब मार्गावर हुंडाई शो रूम समोर आणि आर्णी मार्गावर वनवासी मारोती परिसरात तांत्रिक त्रुटी ठेवली. त्यामुळे येथे अनेक अपघात घडले. त्यात अनेकांचा जीव गेला कित्येक नागरिक कायमचे जायबंदी झाले.

## वाघाच्या हल्ल्यात महिला ठार : तीन दिवसात पाच महिलांचा बळी

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १२ :
जिल्ह्यात वाघाचे हल्ले वाढले असून सलग तिसऱ्या दिवशी मूल तालुक्यातील भादुर्णी येथे जंगलात तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या भूमिका दिपक भेंडारे (३०) या महिलेवर वाघाले हल्ला केला असता तिचा घटनास्थळीच मृत्यु झाला.
तीन दिवसात वाघाने घेतलेला हा पाचवा बळी आहे. या घटनेमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी जंगलाला आग लावण्याचा प्रयत्न केला. या जिल्ह्यात मागील तीन दिवसात वाघाचे हल्ले वाढले असून सिंदेवाही व मूल या दोन तालुक्यात पाच महिला वाघाच्या हल्ल्यात ठार झाल्या आहेत.
मूल तालुक्यातील भादुर्णी येथेही आईच्या घरी वास्तव्याला असलेली भूमिका दिपक भेंडारे सकाळी आठ वाजताच्या सुमारास तेंदूपत्ता तोडण्यासाठी जंगलात गेली होती. यावेळी झुडपात दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला केला. यात भूमिकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. संतप्त ग्रामस्थांनी वन अधिकाऱ्यांवर प्रचंड संताप व्यक्त करून वाघाचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी केली. तर काही ग्रामस्थांनी रागाच्या भरात जंगलाला आग लावण्याचा प्रयत्न केला. वन विभागाच्या अधिकारी व पथकाने वेळीच ग्रामस्थांना मज्जाव केल्याने मोठा अनर्थ टळला. दरम्यान तेंदूपत्ता तोडण्यासाठी जंगलात जाणे आता कठीण झाले आहे.

## सैनिक कमी पडले तर मी तयार...

### भारत-पाक युद्धावर बच्चू कडूंचे वक्तव्य



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :
भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये तीन दिवस तीव्र संघर्ष झाला. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान तसेच पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी अड्डे उद्धवस्त केले. यात अनेक दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात भारतीय सैन्याला यश आले आहे. आता दोन्ही देशांमध्ये शस्त्रविराम लागू करण्यात आले आहे. यावर प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी वक्तव्य केले आहे.
बच्चू कडू म्हणाले, नेहमी-नेहमी पाकिस्तानचे वार सुरू असतात. पाकिस्तानचे नेहमीचे दुखणे बंद केले पाहिजे. जसा इंदिरा गांधी यांनी बांगलादेश वेगळा काढला, तसाच पाकिस्तान भारतात घ्यावा. त्यासाठी जर सैनिक कमी पडत असतील तर प्रहारचा कार्यकर्ता आणि बच्चू कडू तयार आहे, असे विधान त्यांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्याची जोरदार चर्चा सुरू आहे.
सध्या पवार कुटुंब आणि दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याचे बोलले जात आहे. यावर बोलताना बच्चू कडू म्हणाले, असे झाले तरी जनतेचे काय भले होणार आहे? राष्ट्रवादी कधी वेगळी होती? पवार साहेब आणि अजित दादा हे वेगळे होते हे शक्य आहे का? ते एकत्रच होते. मीडियासमोर आणि लोकांसमोर नव्हते. मात्र ते एकत्रच होते, असे कडू म्हणाले.
पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले २ जूनला आमचे आंदोलन सुरू होईल आणि ३ जूनला आमची बारामतीत सभा होईल. तीन तारखेला पंकजा मुंडे, चार तारखेला बाळासाहेब पाटील, पाच तारखेला संजय राठोड यांच्या घरासमोर आंदोलन होणार आहे. तर सात जूनला राज्याभिषेकाच्या दिवशी आम्ही नागपूरकडे आगेकूच करणार आहोत. देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर आमचे मुक्कामी आंदोलन राहील.
कोरोना काळात ताटे वाजवले होते. त्यामुळे ताटे वाजवून आंदोलन करणार आहोत. त्यांनी जे बोलले होते, त्याची आठवण करून देण्यासाठी ताटे वाजवणार आहोत, कारण ते विसरले आहेत. बावनकुळे म्हणतात पाच वर्षात आम्ही कधीही कर्जमाफी करू. जनतेला फसवण्याचे काम हे सरकार करत आहे. वेळ पडल्यास गुन्हे दाखल करून कोर्टात जाऊ, असा इशारा त्यांनी दिला आहे.

## मंत्री आशिष शेलार यांचा बार्सिलोना दौरा चर्चेत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
मंत्री आशिष शेलार हे सध्या बार्सिलोना मध्ये आयोजित प्रदर्शनास सहभागी होण्यासाठी जात आहेत. मात्र त्यांच्या दौऱ्यावर करदात्यांचा पैसा वाया काय घालायचा? असा प्रश्न काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी उपस्थित केला आहे. राज्याच्या तिजोरीत खणखणाट असताना पैसा का वाया घालवायचा? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.



वर्षा गायकवाड यांनी एका पोस्टच्या माध्यमातून मंत्री आशिष शेलार यांच्यावर निशाणा साधला आहे. यामध्ये त्यांनी आशिष शेलार या प्रदर्शनातून आल्यानंतर काय घेऊन आलेत? त्याचा फायदा काय? याबाबत माहिती देतील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.
एकीकडे जनतेला दिलेला शब्द पाळण्यासाठी तिजोरीत पैसा नाही. योजना सुरळीत राबवता येत नाही. राज्याच्या तिजोरीत खणखणाट आहे. यात असाच करदात्यांचा पैसा वाया का घालवायचा? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, या टीकेनंतर भाजपाकडून कोणतीही प्रतिक्रिया अद्यापपर्यंत आली नाही.

: हॅलो डॉक्टर :

## हृदयविकार आणि उपचार



लोकारोग्य

चुकीचा आहार किंवा खाण्यापिण्याच्या बदलत्या सवयी, शारीरिक हालचालींचा अभाव, कामाचा ताण, धूम्रपान, मद्यपान या सर्व वाईट गोष्टींचा विपरीत परिणाम हृदयावर होतोय. पूर्वी साठी नंतर उद्भवणारा हृदयविकाराचा आजार आता विशीतल्या कोवळ्या तरुणांमध्ये दिसतो. हृदयविकार हा गंभीर आजार असून, अकस्मात हृदयविकाराचा झटका येऊन अनेक लोक मृत्युमुखी पडतात. हा आजार नेमका कशामुळे होतो? हृदयविकाराची कारण काय? त्यावर योग्य उपचार आणि हृदयविकार होऊच नये म्हणून प्रतिबंधात्मक स्वरूपाचे उपाय? याच प्रश्नांचा उहापोह करण्यासाठी हृदयरोग तज्ज्ञ डॉ. विनोद खंडाईत यांच्याशी साधलेला संवाद.

**हृदयाचं कार्य नेमकं कसे चालते?**

○ जगभरात हृदयविकारामुळे ३० टक्के लोकांचे मृत्यू होतात, म्हणजे जवळपास ७० लाख लोक हृदयविकारामुळे मृत्यू पावतात. आपल्या भारतात हृदयविकाराच प्रमाण वाढताना दिसते. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत हृदयच आपला साथीदार असतो. हृदय म्हणजे स्नायूंचा पंप आहे. ४ झडप, ४ चेम्बर्स आणि ते ३ भागानी कव्हर केलेलं असत. रेटिमा, मसल आणि पेरिकार्डियन अशा हृदयाच्या तीन लेअर असतात. हृदयाचं महत्वाच कार्य म्हणजे आपल्या शरीरातील पेशींना ऑक्सिजन आणि इतर पोषक घटकांचा सुरळीत पुरवठा करणे हे आहे. हृदयाला रक्तपुरवठ्याची गरज असते. हा रक्त पुरवठा कोरोनरी आर्टीट्स मुळे होतो. हृदयाचे विकार हे मसल, पेरिकार्डीन यामध्ये अडथळे आल्यामुळे किंवा रक्ताभिसरण प्रक्रिया बिघडली की होतात.

**हृदयविकार संदर्भात कोणते विकार निर्माण होतात?**


○ हृदयविकारामुळे जे विकार होतात ते दोन भागात विभागता येतील. कांजीनायटल हार्ट डिसीज जे जन्मतः असतात आणि दुसरे अक्वायर्ड हार्ट डिसीज. यापैकी कांजीनायटल हार्ट डिसीज हा जन्मजात बाळमध्ये दिसतो. त्याच्या हृदयाला होल असते. यांच्या शरीरात शुद्ध आणि अशुद्ध ऑक्सिजनची मिक्सिंग प्रक्रिया होते त्यामुळे बाळ थकते, धडधड होणे, सतत न्यूमोनिया किंवा या मुलांचं वजन वाढत नाही, अशी लक्षण दिसतात.
अक्वायर्ड हार्ट डिसीजमध्ये हृदयाच्या आवरणाभोवती मसलच्या बाहेर पाणी निर्माण होऊन मसल जाड किंवा पातळ बनते आणि हृदयविकार होतो. यामुळे अचानक मृत्यू देखील होतो. पेरोकार्डिक डिसीज मध्ये डाव्या झडपा निकामी होतात आणि वॉल निकामी होऊन हृदयाला रक्त पुरवठा करणाऱ्या धमन्यांमध्ये बिघाड निर्माण होतो. आपण दिवसभरात १ लाखांहून अधिक वेळा जे श्वसन करतो त्याचा वेग कमी होऊन चक्कर येणे, धाप किंवा दम लागणे,थकवा येणे अशी लक्षण दिसतात असे साधारण हृदयाचे विकार असतात.

**हृदयविकार होण्याची कारण नेमकी काय असतात?**

○ अक्वायर्ड हार्ट डिसीज हे हृदयविकाराच मुख्य कारण आहे. जसजस वय वाढत तसे शरीरातील कोलेस्टोरेलचे प्रमाण वाढत जाऊन त्याचा हृदयाच्या आतल्या आवरणात थर जमा होतो यामुळे आर्टर्सची रुंदी कमी होऊन रक्तपुरवठा हा कमी होत जातो आणि हृदयविकार संभवतो.
अनुवंशिकता हे देखील हृदयविकाराचा कारण आहे. यामध्ये मॉडीफायबल आणि नॉन मॉडीफायबल असे दोन प्रकार आहेत. आपल्या कुटुंबातील आई, वडील,काका,आजोबा,आजी याना असणारा हृदयविकार हा अनुवंशिकतेने आपल्याला होऊ शकतो. स्त्रियांमध्ये ५० वर्षापर्यंत म्हणजे रजोनिवृत्तीपर्यंत हृदयविकाराचा धोका कमी असतो. मॉडिफाइड हृदयविकार यामध्ये उच्चरक्तदाब, मधुमेह, धूम्रपान किंवा मद्यपान, शारीरिक हालचालींचा अभाव ताणतणाव, अपुरी झोप यामुळे शरीरातील कोलेस्टोरेलचे प्रमाण वाढून हृदयविकार होतो.

**हृदयविकारावर नेमके उपचार काय आहेत?**

○ हृदयविकाराचा झटका आलाच तर पहिला तास अत्यंत महत्वाचा असतो. जवळच्या डॉक्तरांकडे त्याला नेलं की प्रथम त्या रुग्णाला रक्ताची जी गुठळी हृदयात झालेली असते ती विरघळविण्यासाठी गोळी देणं महत्वाचं आहे. नंतर १० मिनिटात ईसीजी काढून ताबडतोब अँजिओप्लास्टी करणे देखील तितकेच महत्वाचे असते. एखाद्या सरकारी किंवा खाजगी हॉस्पिटल यामध्ये अँजिओप्लास्टी होऊ शकते. अँजिओप्लास्टी म्हणजे आर्टरी मध्ये जे ब्लॉकिज असतात त्यासाठी हात किंवा पायाच्या नसेमधून कॅथ्रेड टाकून त्यातून बलून आत मध्ये सोडला जातो आणि आर्टरी ओपन करून पुन्हा हा बलून बाहेर काढला जातो.
आर्टरीज मोठी करण्यासाठी हल्ली स्टेन्ड टाकले जातात हे स्टेन्ड स्टीलचे किंवा कोबाल्टचे असतात ज्यामुळे आर्टरी आंधळा रक्तपुरवठा सुरळीत होऊन रुग्णाला जीवदान मिळते. मात्र आर्टरी मधील ब्लॉकिज जास्त मोठे असतील तर मात्र बायपास शस्त्रक्रिया करूनच हे ब्लॉकिजेस काढावे लागतात. ■ ■



## भारतीय औषध निर्माण क्षेत्रात १३ ते १५ टक्के वाढीची शक्यता

भारताच्या कंत्राट संशोधन, विकास आणि उत्पादन संघटना (सीआरडीएमओ) क्षेत्राला, जे जागतिक औषध कंपन्यांना सेवा देते, या आर्थिक वर्षात त्यांच्या महसुलात १३-१५% वाढ होण्याची शक्यता आहे. सीआरडीएमओ क्षेत्र, जे लहान रेणूंच्या रसायनशास्त्राचा शोध घेते आणि विकसित करते आणि उत्पादन करते, ते २६-२८% जास्त ऑपरेटिंग मार्जिन टिकवून ठेवेल अशी अपेक्षा आहे. परिणामी मजबूत रोख प्रवाह भारतीय सीआरडीएमओना कर्ज निधीवर मर्यादित अवलंबून राहून भांडवली खर्च सुरू ठेवण्यास आणि त्यांचे निरोगी क्रेडिट प्रोफाइल टिकवून ठेवण्यास सक्षम करेल.
अमेरिकेसाठी आरोग्यसेवा उद्योगाची गंभीरता, कॉम्प्लेक्स इंटरमीडिएट आणि ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल घटक (एपीआय) 2 तयार करण्यासाठी सीआरडीएमओवरील वाढती अवलंबित्व, या क्षेत्राला अमेरिकेकडून लादल्या जाणाऱ्या संभाव्य शुल्कांना तोंड देण्यास मदत करेल. गेल्या आर्थिक वर्षात या क्षेत्राच्या अंदाजे ७०,००० कोटी रुपयांच्या महसुलाच्या सुमारे ५०% वाटा असलेल्या १९ भारतीय सीआरडीएमओचे विश्लेषण हेच दर्शवते. जागतिक सीआरडीएमओ ४ बाजारपेठेत भारताचा वाटा ५% पेक्षा कमी आहे, ज्यावर अमेरिका, युरोप आणि चीनचे वर्चस्व आहे.या विभागात औषध विकास, क्लिनिकल ट्रायल स्टेज सेवा आणि व्यावसायिक उत्पादन आणि औषध संशोधन आणि शोध संबंधित सेवा प्रदान करणारे कंत्राटी संशोधन ऑपरेशन्स (सीआरओ) यांचा समावेश आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

**रक्त शुद्धीसाठी उपयुक्त कारले**

कारले हे आरोग्यासाठी खूप चांगले मानले जातो. नैसर्गिकरीत्या रक्त शुद्ध करण्यासाठी कारले उपयुक्त ठरते. यामध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. जे रक्त शुद्ध करण्यास मदत करते. कारल्यामध्ये असलेले चरेंटिन तत्व शरीरातील रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करते.
शिवाय, कारल्यामध्ये पॉलिपेप्टाइड मुबलक प्रमाणात असते, जे शरीरातील रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवते.
कारल्यातील पोटॅशियम आपल्या शरीरातील रक्तदाब नियंत्रित करते. न्यूरोट्रांसमिशनची प्रक्रिया सुधारण्यास मदत होते. कारल्याला २० मिनिटे नारळाच्या पाण्यात ठेवा. काही वेळाने ते चांगले धुवून नंतर भाजी करा. त्यामुळे कारल्याचा कडूपणा कमी होईल. ■



## गुणनियंत्रण अधिकाऱ्यांनी पास केलेला तांदुळ लॅबमध्ये नापास!

■ महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. १२ :
गडचिरोली जिल्ह्यात आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत केंद्रावरुन उचल केलेल्या धानाची भरडाई न करता खुल्या बाजारात विक्री करून खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा शासनाला केला जात आहे. सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्सनी मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करू नये याकरिता प्रत्येक बेसगोदामात गुणनियंत्रण अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांनी पास केलेला तांदूळ लॅबमध्ये तपासणीत नापास होत असल्याची गंभीर माहिती समोर आली आहे.
धान भरडाई केल्याचे दाखवून शासन जमा करण्याकरीता आणल्या जाणाऱ्या अयोग्य तांदळाची स्थानिक गुणनियंत्रण अधिकारी सदर तांदळाची गुणवत्ता न तपासता संबंधित राईसमिलर्सकडून मोठी रक्कम घेऊन तांदूळ पास करत असल्याची माहिती आहे . या संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी अयोग्य तांदूळ पुरवठा करणारे राईसमिलर्स व गुणनियंत्रण अधिकारी तसेच पुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकारी यांच२वर मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी केली आहे . यासंदर्भात त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेकडे तक्रार केली आहे.
गडचिरोली जिल्ह्यात नारायण ॲग्रो इंडस्ट्रीज रामानुजपुर ता. सिरोंचा, श्रीराम राईसमिल कुनघाडा, जनता राईसमिल आरमोरी, देविकमल राईसमिल वडसा, जेजानी राईसमिल वडसा या राईसमिलकडून मानवी खाण्यास अयोग्य तसेच मायाश्री राईस इंडस्ट्रीज वडसा, मायाश्री फुड इंडस्ट्रीज वडसा तसेच मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीज वडसा यांचे मोठ्या प्रमाणात बिआरएल तांदूळ केंद्र शासनाच्या तपासणी पथकाने रंगेहाथ पकडला होता. निकृष्ठ तांदूळ पकडण्यात आल्याने संबंधित राईसमिलर्सवर नियमानुसार कारवाई होणे अपेक्षित होते. पण कारवाई न करता आजही त्यांचेकडे नियमबाह्यपणे भरडाईचे काम देण्यात आले आहे.
दरम्यान तांदळाची गुणवत्ता तपासणी न करता संबंधित राईसमिलर्स कडुन मोठी रक्कम घेऊन निकृष्ठ तांदूळ स्विकारणारे गुणनियंत्रण अधिकारी सदर तांदूळ पास करीत असल्यानेच मोठ्या प्रमाणात निकृष्ठ तांदुळ शासनाला पुरवठा होऊन रेशनिंगच्या माध्यमातून गोरगरीबांच्या माथी मारल्या जात आहे.
राईसमिलर्स, गुणनियंत्रण अधिकारी व वाहतुक कंत्राटदार यांचे संगनमताने तांदळाची कोणतीही गुणवत्ता तपासणी न करता व तांदूळ सिएमआर गोडाऊन मध्ये न नेता तांदूळ परस्पर राईसमिल मधुन उचलण्यात येतो. तसेच काही वेळा राईसमिलर्स मार्फत सिएमआर गोडाऊन मध्ये मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ जमा केल्यानंतर जोपर्यंत तांदूळ बाहेर जिल्ह्यात किंवा स्वस्त धान्य दुकानात वितरीत करण्याकरीता पाठविल्या जात नाही, तोपर्यंत गुणनियंत्रण अधिकारी तांदूळ स्वीकृत केल्याची पावत्या देत नसल्याचे समोर येऊ लागले आहे.
ही गंभीर बाब गडचिरोली जिल्ह्यातील पुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकारी व विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर मधील पुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच मंत्रालयातील सिएमआर टेबल सांभाळणारे कनिष्ठ व वरिष्ठ अधिकारी यांना माहित असुन देखील त्यांनी याकडे डोळेझाक चालवली आहे.
विशेष म्हणजे या कामाला गती देण्यासाठी देसाईगंजच्या तंबाखु लाईन मधील कथित राईसमिल मालक अधिकाऱ्यांना देण्याच्या नावाखाली धानाचे लाट मिळवून देण्यासाठी प्रती लाट ४० हजार तर तांदळाचे लाट पास करण्यासाठी प्रती लाट ४० हजार असे ८० हजार राईसमिलर्स कडुन वसूल केले जात आहेत. या अर्थकारणाची ऑडिओ, व्हिडिओ रेकॉर्डींग क्लिप तयार करून व अधिकाऱ्यांना धमकावून, ब्लॅकमेल करून अयोग्य तांदूळ पुरवठा करण्याचा गोरखधंदा सुरू आहे.
पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसह राईस मिलर्सचा व तांदुळ वाहतुक करणारे कंत्राटदार यांचा तेवढाच सहभाग असल्याने या संघटित गुन्हेगारीतुन शासकीय धान खरेदी केंद्रावरुन उचल केलेला धान गायब होणे, शासनाला निकृष्ठ दर्जाचा तांदूळ जमा करणे संघटितपणे सुरू असल्याने पकडण्यात आलेल्या दोषी राईसमिलर्ससह गुणनियंत्रण अधिकारी तसेच वाहतुक कंत्राटदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी कऱ्हाडे यांनी अजित पवार यांचेकडे केली आहे.
विशेष म्हणजे अलिकडे पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांचे एक एक कारनामे चव्हाट्यावर येऊ लागल्याने पवार काय कारवाई करतात,याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.